cmyk

## संपादकीय

### शहरी कौलानंतर ग्रामीण कसोटी

महाराष्ट्रातील नगरपरिषदा आणि नगरपंचायतींच्या निवडणुका पार पडल्यानंतर नुकत्याच २९ महानगरपालिकांच्या निवडणुका झाल्या आणि या निवडणुकांनी राज्यातील शहरी राजकारणाचा स्पष्ट कौल दिला. सत्ताधारी महायुतीने या निवडणुकांमध्ये मोठी बाजी मारली असून, त्यातही भारतीय जनता पक्ष सर्वाधिक मोठा पक्ष म्हणून पुढे आला आहे.


दैनिक

# राज्य लोकतंत्र

www.epaper.rajyaloktantra.com नवी दिशा... नवे विचार..... email:rajyaloktantra75@gmail.com

● पुणे ● अहिल्यानगर ● छत्रपती संभाजीनगर ● जालना ● धाराशिव जिल्ह्यात वितरीत होणारे दैनिक

बीड – महाराष्ट्र | वर्ष–५ | अंक–२६२ | सोमवार दि.१९ जानेवारी २०२६ | RNI No.: MAHMAR/2021/85884 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने–६ | किंमत ३ रूपये


# वैद्यनाथ कारखानाच बनला शेतकऱ्यांचा आधार

## समाज माध्यमांमध्ये अक्कल पाजळणाऱ्यांना चपराक; ऊस उत्पादकांची सर्वात पहिली पसंद

बीड । प्रतिनिधी

**गेल्या दोन ते तीन महिन्यापूर्वी मंत्री पंकजा मुंडे यांनी वैद्यनाथ कारखाना विकला म्हणून त्यांना समाज माध्यमांमध्ये मोठे टार्गेट करण्यात आले. मात्र सध्या हाच पांगरी येथील स्वर्गीय गोपीनाथ मुंडे यांचा कारखाना ऊस उत्पादकांसाठी मोठा आधार बनला आहे. सर्वाधिक दर देण्याची घोषणा बोत्रे पाटील यांनी केल्याने सध्या वैद्यनाथ कारखाना पहिली पसंत बनला आहे. तसेच टारगेट करण्याच्या नावाखाली समाज माध्यमावर अक्कल पाजाळणाऱ्यांना खुद्द शेतकऱ्यांनीच चपराक दिल्याचे दिसून येत आहे.**



स्व.गोपीनाथ मुंडे यांनी पांगरी येथे सहकारी तत्त्वावर वैद्यनाथ कारखाना स्थापन केल्यानंतर आशिया खंडातील हा कारखाना दुसऱ्या क्रमांकाचा बनला होता. बीड जिल्ह्यामध्ये सर्वाधिक दर देण्याची परंपरा त्यांनी त्यांच्या हयातीमध्ये दरवर्षी कायम ठेवली होती. तसेच वैद्यनाथ कारखान्याबरोबर मुंडे साहेबांनी जवळपास २५ कारखाने भाडेतत्त्वावर चालवायला घेतले होते. त्यामुळे साखर उद्योगांमध्ये त्यांचा मोठा धबधबा होता. तसेच वैद्यनाथ कारखान्याच्या ▶▶ पान २ वर

### “ पूर्ण क्षमतेने गाळत सुरू

वैद्यनाथ कारखाना सुरू झाल्यानंतर ७० क्षमतेचे बॉयलर सुरू होते. तसेच ऊस देणाऱ्या शेतकऱ्यांची संख्या खूप मोठी असल्याने पूर्ण क्षमतेने गाळप होत नव्हते. ही बाब लक्षात घेऊन कारखाना प्रशासनाने ४० क्षमतेचे बॉयलर गेल्या दोन दिवसापूर्वी सुरू केले असून सध्या कारखाना पूर्ण क्षमतेने सुरू आहे त्यामुळे बीड जिल्ह्यातील शेतकऱ्यांचा ऊस राहणार नाही अशी आशा आता ऊस उत्पादकांना आहे. तसेच येणाऱ्या काळात ६००० मॅट्रिक टन प्रतिदिन क्षमतेने कारखाना गाळप करणार असल्याचे समजते.

### “ जातीपातीचे राजकारण मोडीत निघाले

वैद्यनाथ कारखान्याला सध्या मोठ्या प्रमाणात शेतकऱ्यांकडून ऊस दिला जात आहे. ऊस देणाऱ्या शेतकऱ्यांमध्ये एका नव्हे तर सर्व जातीचे शेतकरी आहेत. त्यामुळे गेल्या एक ते दोन वर्षापासून जातीपातीचा जो प्रकार सुरू होता तो शेतकऱ्यांनी आणि कारखाना प्रशासनाने मोडीत काढल्याचे दिसत आहे.

### करार करणारे वाहनधारक त्रस्त

सध्या वैद्यनाथ कारखान्याला दोन ते तीन दिवसानंतर वाहन खाली होऊन येत आहे. त्यामुळे ऊसतोड मजुरांसह वाहनधारकांच्या व्यवसायावर सुद्धा परिणाम होत असल्याचे म्हटले जात असून बिगर कराराच्या वाहनधारकांची चांदी तर करणाऱ्या वाहनधारकाला मनस्ताप सहन करण्याची वेळ येत असल्याचे म्हटले जात आहे. त्यामुळे कारखाना प्रशासनाने करार करणाऱ्या वाहनधारकांना वाहन खाली करण्यासाठी प्रथम प्राधान्य द्यावे अशी मागणी होत आहे.

## थोडक्यात...

### झारखंडमध्ये भीषण अपघात; ५ ठार

लातेहार : झारखंडमधील लातेहार जिल्ह्यातील महुआडांड पोलिस ठाण्याच्या हद्दीत असलेल्या ओरसा व्हॅलीत बस उलटून भीषण अपघात झाला आहे. माध्यमांतील वृत्तांनुसार, या अपघातात अनेक प्रवासी गंभीर जखमी झाल्याचे बोलले जात आहे. याशिवाय, मोठी जीवितहानी झाल्याची भीतीही व्यक्त केली जात आहे.घटनेची माहिती मिळताच महुआडांड पोलिस ठाण्याचे प्रभारी मनोज कुमार यांनी तातडीने घटनास्थळी धाव घेतली. पोलिस प्रशासनाकडून घटनेची सखोल चौकशी सुरू करण्यात आली आहे. मदतकार्यासाठी घटनास्थळी तात्काळ रुग्णवाहिका रवाना करण्यात आल्या असून जखमींना रुग्णालयात हलवण्यात येत आहे.महुआडांडचे सरकारी रुग्णालय जखमींनी भरले आहे. मिळालेल्या माहितीनुसार, बसमधील लोक छत्तीसगडमधील बलरामपूर येथून लोध फॉल या पर्यटनस्थळाला भेट देण्यासाठी निघाले होते.

### महाराष्ट्रात भागीदारी वाढवण्याबाबत चर्चा

दावोस : अमेरिकेचे भारतातील राजदूत सर्जियो गोर यांनी शनिवारी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेतली. अमेरिकेची महाराष्ट्रातील गुंतवणूक तसेच महाराष्ट्रातील व्यवसायांना अमेरिकेत संधी यावर चर्चा झाल्याचे देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले. व्यापार, गुंतवणूक, तंत्रज्ञान व उत्पादन या विषयांवर दोघांमध्ये चर्चा झाल्याची माहिती समोर आली आहे. महाराष्ट्र व अमेरिकेतील भागीदारी अधिक दृढ करण्यावर दोन्ही नेत्यांनी लक्ष केंद्रीत केले आहे. व्यापार आणि गुंतवणूक, मनोरंजन, तंत्रज्ञान, उत्पादन, ऊर्जा आणि आरोग्य या क्षेत्रांमध्ये अमेरिका व महाराष्ट्राची भागीदारी वाढवण्यावर दोघांमध्ये चर्चा झाली.

### इराणने केले जहाज जप्त, १६ भारतीय ताब्यात

नवी दिल्ली : इराणने आंतरराष्ट्रीय समुद्रात भारतीय क्रू सदस्य असलेल्या एका जहाजाला ८ डिसेंबर २०२५ रोजी जप्त केले होते. त्या जहाजावर १६ भारतीय क्रू सदस्य होते. या क्रू सदस्यांना इराणने ताब्यात घेतले आहे. दरम्यान, ८ डिसेंबरनंतर भारतीय क्रू सदस्यांबाबत त्यांच्या कुटुंबियांना कोणतीही माहिती मिळू शकलेली नाही. इराणमधून ६ हजार टन डिझेलची तस्करी केल्याचा आरोप करत इराणने जहाज जप्त केले आहे. तेहरानमधील भारतीय दूतावासाने भारतीय क्रू सदस्यांना ‘कॉन्सूलर ऍक्सेस’ देण्याची मागणी इराणकडे केली आहे. ‘कॉन्सुलर ॲक्सेस’ मिळाल्यास परदेशातील तुरुंगात अडकलेल्या भारतीयाला भेटून त्यांची चौकशी करण्याचा अधिकार भारतीय अधिका–यांना मिळतो. इराणच्या ‘इस्लामिक रिव्होल्युशनरी गार्ड कोर्प्स’ने ‘एमटी व्हॅलिएंट रोअर’ नावाचे एक जहाज जप्त केले आहे. यूएईजवळच्या दिब्बा बंदराजवळील आंतरराष्ट्रीय समुद्रात इराणने ही कारवाई केली होती.

### इंडिगोच्या विमानात बॉम्बची धमकी

लखनौ : आकाशात हजारो फूट उंचावर विमान उडत असताना अचानक ‘विमानात बॉम्ब आहे अशी चिठ्ठी सापडल्याने प्रवाशांमध्ये एकच खळबळ उडाली. दिल्लीहून पश्चिम बंगालमधील बागडोगरा येथे जाणाऱ्या इंडिगोच्या विमानात बॉम्ब असल्याची धमकी मिळाल्याने विमानाचे तातडीने लखनौ विमानतळावर इमर्जन्सी लँडिंग करण्यात आले आहे. या विमानात २२२ प्रवासी आणि कर्मचारी होते. इंडिगोचे विमान (फ्लाइट ६ ई ६६५०) सकाळी दिल्लीहून बागडोगरासाठी झेपावले होते. विमान हवेत असतानाच विमानातील टॉयलेटमध्ये एका कर्मचाऱ्याला हाताने लिहिलेली एक चिठ्ठी आढळली. एका टिशू पेपरवर ‘‘विमानात बॉम्ब आहे’’ असे लिहिलेले होते. ही माहिती मिळताच वैमानिकाने तत्काळ एअर ट्रॅफिक कंट्रोलला याची कल्पना दिली.

# तुतारीची धून थांबणार, घडीचा गजर होणार!

## शरद पवारांची राष्ट्रवादी ही घड्याळावरच निवडणूक लढविण्याची शक्यता

पुणे । प्रतिनिधी

**राज्यातील २९ महानगरपालिकेच्या निकालानंतर भाजपला मोठे यश मिळाल्याचे स्पष्ट झाले आहे. तर एकत्र आलेल्या राष्ट्रवादी कॉंग्रेस अजित पवार गट आणि राष्ट्रवादी कॉंग्रेस शरदचंद्र पवार गटाला फारसे यश मिळवता आलेले नाही. अजित पवार यांनी पुणे आणि पिंपरी–चिंचवडसाठी मोठे प्रयत्न केले होते. मात्र येथेही मित्रपक्ष असलेला भाजप वरचढ ठरला. यानंतर आता जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुकीमध्ये दोन्ही राष्ट्रवादी एकत्र येणार आहेत. मात्र या निवडणुकीत तुतारी नाही तर घड्याळाच्या चिन्हांवर लढण्याची तयारी शरद पवारांच्या पक्षाकडून केली जाणार असल्याची माहिती समोर येत आहे.**




**मत विभाजन टाळून एकत्र लढल्यास फायदा होईल अशी भूमिका शरद पवारांच्या राष्ट्रवादीकडून घेतली जात आहे.**

शनिवारी झालेल्या बैठकीमध्ये जिल्हा परिषद निवडणुकीसाठी राष्ट्रवादी कॉंग्रेस शरद पवार पक्षाने घड्याळ चिन्हावर निवडणूक लढवावी त्यांना अशी मागणी पदाधिकाऱ्यांनी केली. त्यानंतर दोन्ही पक्षांमधील मत विभाजन टाळण्यासाठी घड्याळाच्या चिन्हावर निवडणूक लढवण्यावर दोन्ही पक्षांमध्ये एकमत झाल्याची माहिती आहे. दरम्यान, १६ जानेवारी पासून राज्यात जिल्हा परिषद आणि पंचायत समितीच्या निवडणुकीसाठी अर्ज भरण्यास सुरुवात झाली आहे. त्यामुळे लवकरच याबाबत अंतिम निर्णय होण्याची शक्यता आहे. नुकत्याच झालेल्या राज्यातील महानगरपालिका मध्ये भाजप हा सर्वाधिक मोठा पक्ष ठरला आहे. त्यानंतर शिंदे यांची शिवसेना दुसऱ्या क्रमांकावर आहे. अजित पवार हे महायुतीच्या माध्यमातून सत्तेमध्ये आहेत. मात्र तरीसुद्धा त्यांच्या वाट्याला अत्यंत कमी जागा आल्या. विशेष म्हणजे पुणे आणि पिंपरी चिंचवड ▶▶ पान २ वर

# शासकीय कर्मचाऱ्यांसाठी आज पासून हेल्मेट सक्ती



बीड । प्रतिनिधी

**बीड जिल्ह्यातील वाढते अपघाताचे प्रमाण पाहता पोलीस अधीक्षक नवनीत कावत यांनी एक आदेश जारी केला असून आज दिनांक १९ जानेवारी पासून जिल्ह्यातील सर्व शासकीय कार्यालयातील कर्मचाऱ्यांसाठी हेल्मेट सक्ती करण्यात आली आहे. या आदेशाचे पालन होते की नाही याची अंमलबजावणी करण्यासाठी बीड जिल्हा वाहतूक शाखेच्या कर्मचाऱ्यांचे पथक प्रत्येक शासकीय कार्यालयासमोर तैनात राहणार आहे.**

जिल्हाधिकाऱ्यांच्या दालनामध्ये १३ जानेवारी रोजी रस्ते सुरक्षा समितीची बैठक झाली. या बैठकीमध्ये अपघाती मृत्यू बाबत सविस्तर चर्चा झाली. दुचाकी वर झालेल्या एकूण मृत्यू पैकी ९० टक्के मृत्यू हेल्मेट न वापरल्याने झालेले आहेत. त्यामुळे रस्ते सुरक्षा अभियानांतर्गत पोलीस विभागासह सर्व शासकीय कार्यालयात अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना हेल्मेट सक्ती करण्यात ▶▶ पान २ वर

### दुखणं म्हशीचं आणि इंजेक्शन पखालीला

पोलीस अधीक्षकांनी अपघात टाळण्यासाठी हा आदेश जारी केला असला तरी मुख्यतः अपघात हे मुख्य रस्त्यावर होतात. शहरांमध्ये अपघाताचे प्रमाण नगण्य आहे. त्यामुळे शहरात हेल्मेट सक्ती करून त्याचा फारसा उपयोग होईल याची शक्यता कमी आहे. पोलीस अधीक्षकांचा हा आदेश म्हणजे दुखण म्हशाच आणि इंजेक्शन पखालीला असाच प्रकार आहे.

# जम्मू काश्मीरमध्ये ५० पैकी ४२ विद्यार्थी मुस्लिम असल्याने वैद्यकीय महाविद्यालयाची मान्यता रद्द

दिल्ली । वृत्तसंस्था

जम्मू–काश्मीरमधील श्री माता वैष्णो देवी वैद्यकीय महाविद्यालयात नीट परीक्षेच्या आधारे प्रवेश झाले असून अंतिम यादीत ५० पैकी ४२ विद्यार्थी मुस्लिम असल्याने त्या कॉलेजची मान्यता रद्द करण्यात आली. तर दुसऱ्या घटनेत मध्य प्रदेशातील बैतुल जिल्ह्यात मुस्लिम व्यक्तीने शाळा सुरू केल्यामुळे ती मदरसा असल्याच्या अफवा पसरवण्यात आल्या. कोणतीही चौकशी, नोटीस किंवा सुनावणी न करता प्रशासनाने थेट बुलडोझर चालवून शाळा पाडली, असे गंभीर आरोप कॉंग्रेसने केंद्रात सत्ताधारी भाजपवर केले. देशातील विविध भागांत अलीकडे घडलेल्या घटनांचा दाखला देत कॉंग्रेसने केंद्रातील भाजप सरकारवर शिक्षण व्यवस्थेला जाणीवपूर्वक सांप्रदायिक रंग देत उद्ध्वस्त करण्याचा गंभीर आरोप केला आहे. कॉंग्रेस मुख्यालयात आयोजित पत्रकार परिषदेत जम्मू–काश्मीर व लडाखचे प्रभारी, खासदार डॉ. सय्यद नासिर हुसेन आणि राष्ट्रीय सचिव दिव्या मडेरणा यांनी सरकारच्या धोरणांवर तीव्र टीका केली.

पत्रकार परिषदेत डॉ. नासिर हुसेन म्हणाले की, चांगली शिक्षण व्यवस्था ही विकसित राष्ट्राची पायाभरणी असते. मात्र सध्याचे सरकार शिक्षण क्षेत्रात ‘‘विष कालवण्याचे’’ काम करत आहे. त्यांनी मध्य प्रदेशातील बैतूल जिल्ह्यातील एका प्रकरणाचा उल्लेख करत सांगितले की, अब्दुल नईम नावाच्या व्यक्तीने स्वतःच्या २० ते २२ लाख रुपयांच्या खर्चातून आदिवासी मुलांसाठी शाळा उभारली होती. सर्व कायदेशीर परवानग्या घेऊन शाळा सुरू करण्यात आली. मात्र मुस्लिम व्यक्तीने शाळा सुरू केल्यामुळे ती मदरसा असल्याच्या ▶▶ पान २ वर

# कॉंग्रेसकडे विकासाचा कोणताही अजेंडा नाही..!

## पंतप्रधानांचा निशाणा,आसाममध्ये अमृत भारत रेल्वेला दाखवला हिरवा झेंडा

काझीरंगा । वृत्तसंस्था

ईशान्येकडील सर्वात मोठी समस्या नेहमीच अंतर राहिली आहे. हृदयांचे अंतर, ठिकाणांचे अंतर. अनेक दशकांपासून, येथील लोकांना असे वाटत होते की देशाचा विकास इतरत्र होत आहे आणि त्यांना मागे सोडले जात आहे. याचा परिणाम केवळ अर्थव्यवस्थेवरच नाही तर विश्वासावरही झाला. आम्ही ही भावना बदलण्यासाठी काम केले. ते म्हणाले की रस्ते, रेल्वे, हवाई मार्ग आणि जलमार्गांनी आसामला जोडण्याचे काम एकाच वेळी सुरू झाले, परंतु कॉंग्रेस पक्षाने कधीही त्याकडे



लक्ष दिले नाही. जेव्हा केंद्रात कॉंग्रेस सरकार सत्तेत होते तेव्हा आसामला सुमारे २००० कोटी रुपयांचे तुटपुंजे रेल्वे बजेट मिळत असे. आता, भाजप सरकारने ▶▶ पान २ वर

### गणराजकडून सक्तीची वसुली

बीड । प्रतिनिधी

बीड शहरात असलेल्या गणराज गॅस एजन्सी कडून दोन मुलांची नेमणूक करून केवायसी करण्यासाठी मोहीम राबवली जात आहे. या मोहिमेद्वारे शंभर रुपये घेऊन केवायसी करा नसता तुमचे गॅस कनेक्शन बंद होईल. असा दम देऊन सक्तीने पैसे वसुली चालू आहे. या विरोधात ग्राहकांमध्ये ▶▶ पान २ वर

### बाजारभाव

कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड, दि.१७ जानेवारी २०२६

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| आवक | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू: ३२.०० क्विंटल | २,३०० | ६,६०० | २,९७३ |
| ज्वारी/हायब्रिड : ५.५० क्विंटल | २,६०० | ४,७०० | ३,४८८ |
| मका/लोकल: ३.५० क्विंटल | १,५०० | १,५०० | १,५०० |
| तूर :७४.५० क्विंटल | ६,००० | ७,३०१ | ६,९६५ |
| उडीद : ७.५० क्विंटल | २,५०१ | ६,५०० | ५,०८८ |
| बाजरी: १३.०० क्विंटल | २,४४१ | २,८३० | २,६३५ |
| मुग: १.०० क्विंटल | ५,२०१ | ५,२०१ | ५,२०१ |
| सोयाबीन: २७.५० क्विंटल | ५,००० | ५,००० | ५,००० |
| हरभरा: ०.५० क्विंटल | ६,८०० | ६,८०० | ६,८०० |

# विजय भाजपाचा की लाडक्या देवा भाऊचा

बीड । प्रतिनिधी

**नुकत्याच झालेल्या महानगरपालिका निवडणुकीत भाजपाने मोठ्या प्रमाणात यश मिळवले मागील काळात झालेल्या निवडणुकांमध्ये भाजपाचा विजय होतो असा आरोप केला जात होता मात्र आता ईव्हीएम वर बोलतांना विरोधी पक्ष दिसत नाही त्यामुळे हा विजय मुख्यमंत्री देवेंद्र फडवणीस यांनी आपले उमेदवार उभे केले आणि निवडून आले त्याला अनेक कारणे आहेत विधानसभेला लाडकी बहीण चालली तशीच लाडकी बहीण भावाच्या मदतीला धावली का? हा देखील विषय महत्त्वाचा आहे पण विजयी झालेल्या उमेदवारांमध्ये भाजप कमी आणि देवाभाऊ प्रेमी अधिक आहेत.**



नुकत्याच झालेल्या राज्यातील महापालिका निवडणुकीमध्ये महायुती महाविकास आघाडी असा काहीही विषय नव्हता वातावरण सर्वत्र भाजपाच्या विरोधात दिसत असले तरी विरोधी पक्षातील कॉंग्रेस, राष्ट्रवादी कॉंग्रेस शरद पवार गट, वंचित बहुजन आघाडी, एमआयएम हे पूर्वीपासून विरोधात होते परंतु त्यातही सहकारी पक्ष असलेले राष्ट्रवादी कॉंग्रेस अजित पवार गट आणि शिवसेना शिंदे गट हे देखील काही प्रमाणामध्ये अनेक ठिकाणी विरोधामध्ये गेले होते त्यामुळे भाजपने ही निवडणूक स्वतंत्ररीत्या लढवली म्हणजेच भविष्यामध्ये भाजप स्वबळावर निवडणूक लढवणार याचीच ही रंगीत तालीम होती असे समजावे लागेल कारण मुंबई ४५ वर्षानंतर ठाकरे च्या ताब्यातून घेण्यात भाजपाला यश आले. भाजप म्हणजेच महाराष्ट्रात सध्या देवेंद्र फडवणीस असे सिद्ध झालेले आहे. मुंबईमध्ये भाजपने सत्ता मिळवणे सोपे नाही त्यातही त्यांनी शिवसेना शिंदे गट यांना सोबत घेतले त्यामागे अनेक अर्थ असू शकतात. त्या ठिकाणी त्यांनी मिळवलेले यश हे भाजप आरएसएस आणि मुख्यमंत्री याचे आहे. हे मात्र कोणीही सांगू शकत नाही आजपर्यंत भाजप विजयी होते ते केवळ ईव्हीएम मशीनमुळे असाच आरोप केला जात होता परंतु आता ईव्हीएम मशीनवर कोणी बोलताना दिसत नाही त्यातही महापालिका निवडणुकीमध्ये मुंबई–कल्याण–वसई– विरार – ठाणे– नाशिक–छ. संभाजीनगर–जालना–लातूर अशा मोठ्या महापालिकेमध्ये भाजपाने मिळवलेले यश फारच मोठे म्हणावे लागेल ज्या ठिकाणी त्यांची कधीही दुहेरी संख्या नव्हती त्या ठिकाणी त्यांनी ती पूर्ण केली भाजप पूर्वी देखील होती भाजप आजही आहे मात्र नेतृत्व बदलले गेले असल्याचे दिसते हा नेतृत्वाचा परिणाम किंवा देवा भाऊचा परिणाम असे म्हणावे लागेल देवा भाऊचे राजकारण सर्वसामान्यांना अद्याप ▶▶ पान २ वर

cmyk

cmyk



## अग्रलेख

# शहरी कौलानंतर ग्रामीण कसोटी

महाराष्ट्रातील नगरपरिषदा आणि नगरपंचायतींच्या निवडणुका पार पडल्यानंतर नुकत्याच २९ महानगरपालिकांच्या निवडणुका झाल्या आणि या निवडणुकांनी राज्यातील शहरी राजकारणाचा स्पष्ट कौल दिला. सत्ताधारी महायुतीने या निवडणुकांमध्ये मोठी बाजी मारली असून, त्यातही भारतीय जनता पक्ष सर्वाधिक मोठा पक्ष म्हणून पुढे आला आहे. विशेष म्हणजे, मुंबईसारख्या देशाच्या आर्थिक राजधानीत भाजपने पहिल्यांदाच महापालिकेवर आपला निर्णायक दावा सांगितला आहे. थोडीफार गणिते जुळली तर भाजपचा महापौर मुंबईत विराजमान होण्याचीही शक्यता निर्माण झाली आहे. एकूणच २९ पैकी २५ ते २६ महानगरपालिकांवर महायुतीची, आणि त्यातही भाजपची एकहाती सत्ता येताना दिसत आहे. या शहरी यशानंतर आता राजकीय लक्ष केंद्रित झाले आहे ते जिल्हा परिषद आणि पंचायत समितीच्या निवडणुकांकडे. शहरी मतदारांचा कौल स्पष्ट होत असतानाच, ग्रामीण मतदारांच्या मनात नेमके काय आहे हे या निवडणुकांमधून समोर येणार आहे. त्यामुळे या निवडणुका केवळ स्थानिक स्वराज्य संस्थांच्या मर्यादेत न राहता, आगामी विधानसभा निवडणुकांचा आरसा ठरणार आहेत.

जिल्हा परिषदेचे राजकारण हे मुळातील, म्हणजेच पायाभूत राजकारण मानले जाते. अनेक मोठ्या नेत्यांची राजकीय कारकीर्द जिल्हा परिषद किंवा पंचायत समितीमधूनच सुरू झाली आहे. ग्रामीण भागात कार्यकर्त्यांचा पाया मजबूत करण्यासाठी आणि संघटनात्मक बांधणीसाठी या निवडणुकांचे महत्त्व अनन्यसाधारण आहे. त्यामुळेच या निवडणुकांमध्ये विजय मिळवणे म्हणजे केवळ सत्तेवर येणे नव्हे, तर भविष्यातील मोठ्या राजकारणासाठी भक्कम पाया घालणे होय.

दीर्घकाळ महाराष्ट्राच्या ग्रामीण राजकारणावर काँग्रेसचा प्रभाव राहिला आहे. अनेक जिल्हा परिषदांवर आणि पंचायत समित्यांवर काँग्रेस व राष्ट्रवादी काँग्रेसची सत्ता होती. मात्र गेल्या काही वर्षांत राज्यातील राजकीय समीकरणे झपाट्याने बदलली आहेत. सत्ताधारी महायुतीला आता ग्रामीण भागातही आपले पाय घट्ट रोवायचे असल्याने जिल्हा परिषद निवडणुकांसाठी त्यांची संपूर्ण यंत्रणा ताकदीने मैदानात उतरणार, हे निश्चित आहे.

महानगरपालिका निवडणुकांमध्ये महायुती विरुद्ध महाविकास आघाडी हे ढोबळ समीकरण अनेक ठिकाणी विस्कळीत झालेले दिसले. जिल्हा परिषद निवडणुकांमध्ये हे विघटन आणखी तीव्र होण्याची चिन्हे आहेत. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये अनेकदा पक्षांपेक्षा स्थानिक नेतृत्व, गटबाजी आणि समीकरणे अधिक प्रभावी ठरतात.

भारतीय जनता पक्ष हा प्रामुख्याने शहरी पक्ष असल्याची पारंपरिक धारणा राहिली आहे. विदर्भातील काही अपवाद वगळता ग्रामीण भागात भाजपला फारशी मोठी मुसंडी मारता आली नव्हती. मात्र गेल्या काही वर्षांत भाजपने ग्रामीण भागात लोकप्रिय असलेल्या अनेक नेत्यांना पक्षात सामावून घेतले आहे. त्यामुळे या निवडणुका त्या नेतृत्वाची खरी कसोटी ठरणार आहेत.

जिल्हा परिषद आणि पंचायत समितीच्या निवडणुकांमध्ये शहरी मुद्दे चालत नाहीत. इथे शाळा, आरोग्य सेवा, पाणीपुरवठा, रस्ते, रोजगार आणि निधी वितरण हेच खरे मुद्दे असतात. केंद्र व राज्य सरकारने या क्षेत्रांत केलेल्या कामाचा दाखला देत भाजपला ग्रामीण मतदारांपुढे जावे लागणार आहे. शहरी भागात मिळालेल्या यशाची पुनरावृत्ती ग्रामीण भागात होईलच, याची खात्री देता येत नाही.

दुसरीकडे, राष्ट्रवादी काँग्रेसचे दोन्ही गट आणि काँग्रेससाठीही या निवडणुका अस्तित्व सिद्ध करण्याची मोठी संधी आहेत. विशेषतः पश्चिम महाराष्ट्रात अजित पवार यांच्या नेतृत्वाखालील राष्ट्रवादी काँग्रेस अजूनही प्रभावशाली आहे. त्यामुळे अनेक जिल्हा परिषदांमध्ये सत्तेसाठी तीव्र चुरस पाहायला मिळण्याची शक्यता आहे.

एकूणच, शहरी कौलानंतर आता ग्रामीण भागात कोणता पक्ष, कोणती आघाडी आणि कोणती रणनीती यशस्वी ठरते, यावर राज्याच्या भविष्यातील राजकारणाची दिशा ठरणार आहे. त्यामुळे जिल्हा परिषद आणि पंचायत समितीच्या निवडणुका केवळ स्थानिक राजकारणापुरत्या मर्यादित न राहता, महाराष्ट्राच्या राजकीय भवितव्याची नांदी ठरणार आहेत.

# रासेयो शिबिर जीवनाला दिशा देण्याचे प्रभावी माध्यम-प्रा.डॉ.अरुण दैतकर

**गेवराई । प्रतिनिधी**

**राष्ट्रीय सेवा योजनेच्या विशेष शिबिरात स्वंयसेविकांना समाजात राहून काम करावे लागते. विविध भूमिका पार पाडाव्या लागतात. त्यामुळे हे शिबिर जीवनाला दिशा देण्याचे प्रभावी माध्यम आहे. असे प्रतिपादन रासेयो बीड जिल्हा समन्वयक प्रा. डॉ. अरुण दैतकर यांनी केले. ते महिला महाविद्यालयाच्या रासेयो विशेष शिबिराच्या समारोप प्रसंगी बोलत होते. यावेळी प्रा. काशिनाथ गोगुले, प्राचार्य डॉ. तात्याराम सोंडगे, पत्रकार विनोद पौळ, प्रतापराव हाटोटे, पत्रकार विनायक ऊबाळे यांची उपस्थिती होती.**

जय भवानी शिक्षण प्रसारक मंडळाचे महिला महाविद्यालय, गेवराई च्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने आयोजित विशेष शिबिराचा समारोप समारंभ उत्साहात पार पडला. याप्रसंगी प्रमुख अतिथी रासेयो बीड जिल्हा समन्वयक प्रा. डॉ. अरुण दैतकर यांनी म्हटले की, या सात दिवसीय शिबिरामध्ये ग्रामीण भागात काम करताना सहकार्य भावना, नेतृत्व गुण, सामाजिक जाणीव व पर्यावरणाचे भान आलेले असते. हे अनुभव आयुष्यभर उपयोगी येतात. त्यामुळे राष्ट्रीय सेवा योजना विशेष शिबिर हे जीवनाला दिशा देण्याचे प्रभावी माध्यम आहे. प्रा. काशिनाथ गोगुले यांनी शिबिरार्थीनी केलेल्या कार्याचे कौतुक केले. ग्रामीण भागातील मुलींनी उच्च शिक्षण घेतले पाहिजे यासाठी माजी मंत्री शिवाजीराव (दादा) पंडित यांनी महिला महाविद्यालय सुरू केले. या शिबिराच्या माध्यमातून हा उद्देश पूर्ण होत असल्याचे प्रतिपादन केले. दै. लोकाशा चे तालुका प्रतिनिधी विनोद पौळ म्हणाले की, राष्ट्रीय सेवा योजना विशेष शिबिरात सहभागी स्वंयसेविकांची सामाजिक जाणीव निश्चितच चांगली राहते. त्या जीवनातील विविध भूमिका पार पाडण्यासाठी सक्षम असतात. त्यामुळे अधिकाधिक विद्यार्थीनींनी या शिबिरामध्ये सहभागी झाले पाहिजे.




प्रतापराव हाटोटे यांनी शिबिरार्थींनी केलेले कार्य गावकऱ्यांनी पुढे चालवावे असे आवाहन केले. प्राचार्य डॉ. तात्याराम सोंडगे यांनी अध्यक्षीय भाषणात शिबिरातील विविध उपक्रमांचे कौतुक करत विद्यार्थिनींनी आत्मसात केलेले सामाजिक भान पुढील जीवनात उपयुक्त ठरेल असे म्हटले. यावेळी कु. गुंजन धापसे, कु. ज्ञानेश्वरी राऊत, कु. वैष्णवी गवारे या शिबिरार्थींनी शिबिरातील आपले अनुभव सांगितले. कार्यक्रमाचे सूत्र संचालन प्रा. डॉ. नामदेव शिनगारे यांनी केले. सात दिवशीय विशेष युवती शिबिरात राबविलेल्या विविध उपक्रमाच्या अहवालाचे वाचन कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. शिवाजी दिवाण यांनी केले तर आभार प्रदर्शन राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या कार्यक्रम अधिकारी प्रो. डॉ. संगीता आहेर यांनी केले. या कार्यक्रमास महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक, शिक्षकेत्तर कर्मचारी, स्वयंसेविका व गावातील ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# तुरीच्या खराब बियाण्यामुळे शेतकऱ्याचे लाखो रुपयांचे नुकसान

## भरपाई न मिळाल्यास ग्राहक मंच मध्ये जाणार



**अंबड । प्रतिनिधी**

**तुरीचं खराब बियाण्यामुळे शेतकऱ्याची लाखो रुपयाचे नुकसान झाली आहे अंबड तालुक्यातील कर्जत येथील शेतकऱ्याची नुकसान झाले असून कंपनीकडून नुकसान भरपाई ना मिळाल्यास ग्राहक मंच मध्ये धाव घेणार आहे. अशी तक्रार कृषी विभागाकडे करण्यात आली तसेच नुकसान चा पंचनामा कृषी विभागाच्या वतीने करण्यात आला आहे.**

राधाकिसन पंढरीनाथ डोंगरे यांचे गट क्र २२३मध्ये दोन हेक्टर शेतीमध्ये श्रीराम कंपनीचे मुन्नी तुरीचे वाण लावलेले होते. परंतु बियाणे खराब असल्याने शेतकऱ्याची खुप मोठी नुकसान झाली असून त्यामुळे आत्महत्या करण्याची वेळ शेतकऱ्यावर आली आहे. तश शेतकऱ्यांनी लेखी तक्रार दिली असता कंपनीचे व कृषी ऑफीस चे कृषी सहाय्यक श्री औटे यांनी पंचनामा केलेला आहेत. परंतु रामा आओ बेनिटीक्स कंपणीचे तुर वान (मुन्नी) हे बियाणे बोगस निघाल्यामुळे नुकसान झाली आहे. मशागत खत औषध हे सगळं करून नुकसान झाली. १८/६/२०२५ शिगे हंगामा साठणे मी अंबड येथील एका दुकानामधून राम्र आग्रो कंपनीचे तुर बियाणे वाण (मुली) या जातीचे १ किलो वजनाचे ३ पाकीट देण्यात आले होते. सदरील पाकीट मधील बियाणं नियमाप्रमाणे लावणी पेरणी करण्यात आली होती या नुकसानीमुळे लाखो रुपयाची नुकसान झाली असे शेतकऱ्याचे म्हणणं आहे.


# वसंतराव नाईक विद्यालय आयोजित तालुकास्तरीय नवनिर्माण प्रज्ञाशोध परीक्षा उत्साहात संपन्न : तीन हजार विद्यार्थ्यांचा सहभाग

**पाटोदा । प्रतिनिधी**

**पाटोदा शहरातील नामांकित असलेल्या वसंतराव नाईक माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय आयोजित पाटोदा तालुका नवनिर्माण प्रज्ञाशोध परीक्षेचा शुभारंभ १७ जानेवारी २०२६ रोजी नवनिर्माण शिक्षण संस्थेचे संस्थापक तथा सहकार महर्षी रामकृष्णजी बांगर साहेब व गटशिक्षणाधिकारी गव्हाणे साहेब यांच्या शुभहस्ते भव्य मैदानात संपन्न झाला यावेळी तब्बल ३००० विद्यार्थ्यांनी परीक्षेमध्ये सहभाग घेतला.**

गेल्या सोळा वर्षापासून हे विद्यालय स्वतःच्या विद्यार्थ्यांबरोबरच तालुक्यातील विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षेची ओळख निर्माण होऊन विद्यार्थ्यांच्या मनामध्ये असलेली स्पर्धा परीक्षेची भीती नाहीशी व्हावी या हेतूने तालुक्यातील सर्व विद्यार्थ्यांना सहभागी होता यावे या हेतूने हा उपक्रम सातत्याने दरवर्षी राबविण्यात येत असून या उपक्रमात दरवर्षी विद्यार्थी संख्येची वाढ होत आहे त्याचप्रमाणे या उपक्रमात प्राथमिक व माध्यमिक शाळांचे विद्यार्थी सहभागी होत आहेत या परीक्षेसाठी तीन गट असून यामध्ये प्राथमिक तिसरी ते चौथी उच्च प्राथमिक पाचवी ते सातवी व माध्यमिक आठवी ते दहावी असे असून या सर्व गटाना समाजातील शिक्षण प्रेमी नागरिकाकडून प्रोत्साहन म्हणून रोख पारितोषिके सन्मान चिन्ह , शाल श्रीफळ व प्रमाणपत्र देऊन प्रोत्साहन दिले जाते. यामध्ये शहीद जवान अजित वालेकर सेवाभावी संस्थेच्या वतीने सुजित वालेकर ज्ञानदीप कोचिंग क्लासेस च्या वतीने प्रमोद गर्जे कैलासवासी जगन्नाथ सानप यांच्या स्मरणार्थ प्रदीप सानप, ग्रामविकास फाउंडेशन येवलवाडी ना सचिव राजेश नागरगोजे,प्रगतशील शेतकरी पांडुरंगराव मस्के यांच्या स्मरणार्थ श्री प्रदीप मस्के कै सौ. सिंधुबाई सुमंतराव नंद यांच्या स्मरणार्थ प्राध्यापक सुधीर नंद, यांच्या वतीने यावर्षी प्रोत्साहित करण्यात येणार आहे तर या यापूर्वी सोळा वर्षात अनेक दानशूर शिक्षण प्रेमी नागरिकांनी प्रोत्साहन दिलेले आहे. यावेळी



उपस्थित सर्व विद्यार्थ्यांना परीक्षेत सहभागी झाल्याबद्दल मा. रामकृष्ण जी बांगर साहेब व गटशिक्षणाधिकारी गव्हाणे साहेब यांनी शुभेच्छा देऊन अभिनंदन केले.या कार्यक्रमास कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक गणेश कवडे ज्येष्ठ नेते गुलाबराव घुमरे केंद्रप्रमुख श्री शांताराम ढेरे सर केंद्रप्रमुख अण्णासाहेब खंडागळे माजी नगरसेवक तथा पत्रकार विजय जोशी नगरसेवक संदीप जावळे पत्रकार अजय जोशी,माजी मुख्याध्यापक एल आर जाधव सर, माजी गटशिक्षणाधिकारी रत्नाकर जायभाय शालेय समिती अध्यक्ष विजया जायभाय माजी पर्यवेक्षक सुनील मस्कर शेख गणी माजी मुख्याध्यापक बाबासाहेब बांधले आनंद क्लोथ सेंटरचे संचालक राजेश जी गुगळे मोहित पडियार, डॉक्टर रवींद्र गोरे, डॉ. चौरे पत्रकार शेख जावेद भाई पत्रकार विजय जाधव, पत्रकार सतीश गरजे, सामाजिक कार्यकर्ते दत्ता साठे माजी मुख्याध्यापक उद्धव बांगर सर दादाराव बांगर सर भागवत जायभाय मुख्याध्यापक पवन मोरे गोविंद सानप सर हरिदास तांबे सर शरद डोरले खोसे पवार सांगळे सर घुमरे सर खंडागळे सर प्राचार्य आवळे सर प्रसाद चौरे विधीतज्ञ सर, राजेश नागरगोजे चंद्रकांत घुमरे, गणेश घुमरे संजय कोकाटे विश्वकर्मा क्षीरसागर परमेश्वर ढवळे कुंभार सर सुनील कोठुळे नानासाहेब खंडागळे शिवराज मंडलिक सत्यवान निर्मळ गोकुळ जिरेकर आदर्श शिक्षिकाश्रीमती संध्याताई टेकाळे, मुख्याध्यापक दादासाहेब घुमरे, रहीम तुला शेख काशीम शेख भाऊसाहेब गुळवे बळीराम नागरगोजे बप्पासाहेब जायभाय सर मुख्याध्यापक नयुम पठाण मुख्याध्यापक श्रीमती भोपळे मॅडम सह तालुक्यातील असंख्य शिक्षक शिक्षिका भगिनी शिक्षण प्रेमी नागरिक उपस्थित होते या सर्वांचे स्वागत विद्यालयाच्या वतीने परीक्षा संयोजक तथाप्राचार्य तुकाराम तुपे पर्यवेक्षक संजय राख व इतर शिक्षकांनी केले कार्यक्रमाचे सूत्रसंचालन परीक्षा नियंत्रक एम आर नागरगोजे सर यांनी केले तर आभार प्रदर्शन अशोक घुमरे यांनी केले.

## पान १ वरून...

पान १ वरून...

### वैद्यनाथ कारखानाच

कार्यक्षेत्रामधील ऊस उत्पादकांना सर्वाधिक दर मिळत असल्याने हा कारखाना मोठा आधार बनला होता. कालांतराने मुंडे साहेबांचे अपघाती निधन झाल्यानंतर काही वर्षाने हा कारखाना बंद पडला. त्यामुळे खऱ्या अर्थाने या भागातील ऊस उत्पादकांचे कंबरडे मोडले होते. याच मुद्द्यावर अनेक वेळा पंकजाताई मुंडे यांना टार्गेट सुद्धा करण्यात आले. देवेंद्र फडणवीस यांच्या पहिल्या मंत्रिमंडळामध्ये त्या मंत्री असताना सुद्धा कारखाना त्या यशस्वीरित्या चालू शकल्या नाहीत. हे जरी सत्य असले तरी कारणे सुद्धा वेगवेगळी होती. काही महिन्यापूर्वी भाडेतत्त्वावर हा कारखाना देण्यासाठी संचालक मंडळांची एनओसी घेण्यात आली होती. समाज माध्यमांमध्ये वाऱ्यासारखी फिरत असताना मंत्री पंकजा मुंडे यांना टार्गेट करण्यात आले. कारखाना विकल्याचे म्हणत त्यांच्यावर अक्षरशा समाज माध्यमांमध्ये खालच्या स्तरावर जाऊन टीका करण्यात आली. काही समाजविरांनी तर आपली अक्कल पाजळत वेगवेगळे तर्क लावले. त्यानंतर पंकजा मुंडे यांनी सुद्धा याबाबत खुलासा करून विषय संपला. यावर्षी वैद्यनाथ कारखाना उशिरा जरी सुरू झाला असला तरी बोत्रे पाटील यांनी तीन हजार पन्नास रुपये भाव जाहीर करून इतर साखर सम्राट यांना मोठा धक्का दिला तर शेतकऱ्यांना सुखद बातमी दिली. सध्या वैद्यनाथ कारखाना सर्वाधिक दर देणार असल्याने परळी बरोबरच केज अंबाजोगाई धारूर वडवणी माजलगाव गंगाखेड सोनपेठ या तालुक्यामधील शेतकरी वैद्यनाथ कारखान्याला ऊस देण्यासाठी प्रतीक्षेमध्ये आहेत. वेळ जरी लागला तरी हरकत नाही पण वैद्यनाथ कारखान्यालाच ऊस आम्ही देणार असा निर्धार सध्या ऊस उत्पादक शेतकऱ्यांनी केला असल्याचे समजते. ज्या वैद्यनाथ कारखान्याला आणि मंत्री पंकजा मुंडे यांना समाज माध्यमांच्या माध्यमातून जोरदार टार्गेट करण्यात आले तोच वैद्यनाथ कारखाना आता ऊस उत्पादक शेतकऱ्यांसाठी आधार बनला आहे. त्यामुळे समाज माध्यमांमध्ये आपली अक्कल पाजळणाऱ्या असंख्य समाजविरांना खुद्द शेतकऱ्यांनीच मोठी चपराक दिल्याचे यावरून दिसत आहे.

--------------

### शासकीय कर्मचाऱ्यांसाठी

आली आहे. हेल्मेट न वापरण्यावर कठोर कारवाई करण्यात येणार असून याची अंमलबजावणी करण्यासाठी सर्व शासकीय कार्यालयाच्या प्रवेशद्वाराजवळ जिल्हा वाहतूक शाखेच्या वतीने एक पोलिस अधिकारी आणि ५अंमलदार यांचे पथक नियुक्त करण्यात येणार आहे. आज पासून याची अंमलबजावणी करण्याचे आदेश देण्यात आले असून सर्व पोलीस कर्मचाऱ्यांसह शासकीय कर्मचाऱ्यांकडून या आदेशाची अंमलबजावणी होते की नाही हे पाहण्यासाठी एक अधिकारी आणि पाच अंमलदारांची नेमणूक करण्यात येणार आहे .याची कडक अंमलबजावणी करण्यासाठी कर्तव्यात कसूर करणाऱ्या पोलीस अधिकाऱ्यांच्या हद्दीमध्ये जर नियमाचे उल्लंघन झाले तर संबंधित अधिकाऱ्यावर प्रशासकीय कार्यवाही करण्यात येईल. हेल्मेट न वापरणाऱ्या अधिकारी कर्मचाऱ्यांवर केवळ दंड नव्हे तर शिस्तभंगाची कारवाई करण्यात येणार आहे. संबंधितांच्या सेवा पुस्तकेमध्ये नोंद करण्यात येईल. असेही पोलीस अधीक्षकांनी आदेश दिले आहेत. संबंधित कर्मचारी जर हेल्मेट वापरत नसेल तर त्याची माहिती विभाग प्रमुखांना पाठवून त्यांच्यावरही विभागीय कारवाई प्रस्तावित केली जाईल. असेही पोलीस अधीक्षकांनी आदेशित केले आहे. दुचाकी अपघाताचे ९०% मृत्यू टाळण्यासाठी ही मोहीम अत्यंत गांभीर्याने आणि कुठल्याही दबावाशिवाय राबवावी असे आदेश देण्यात आले असून मोहिमेचा दैनंदिन अहवाल सायंकाळी सहा वाजेपर्यंत कार्यालयाला कळवावा असेही आदेशित केले आहे.

--------------

### तुतारीची धून थांबणार,

महानगरपालिकेमध्ये सुद्धा अजित पवार यांना अत्यंत कमी जागा मिळाल्या. त्यांनी शरद पवार यांच्या राष्ट्रवादीशी युती करून सुद्धा त्यांच्या वाट्याला कमी जागा आल्याने, राष्ट्रवादीमध्ये असंतोष पसरला आहे. याच पार्श्वभूमीवर अजित पवार यांनी थेट बारामती गाठून शरद पवार यांच्याशी चर्चा केली. यावेळी सुप्रिया सुळे यांच्यासह खासदार अमोल कोल्हे आणि वरिष्ठ नेते उपस्थित होते. या दोघांनी आगामी जिल्हा परिषद पंचायत समिती निवडणुका एकत्र लढविण्याचा निर्णय घेतला आहे. मात्र त्याचवेळी निवडणूक कोणत्या चिन्हावर लढवायची हा प्रश्न उपस्थित झाला आणि शरद पवार यांची राष्ट्रवादी तुतारी सोडून घड्याळावर निवडणूक लढविणार असे समोर आले आहे. यामुळे यापुढे तुतारीचा निनाद होणार की नाही अशी शंका उपस्थित झाली आहे.

------------------

### गणराजकडून

असंतोष निर्माण झाला असून पुरवठा अधिकाऱ्यांनी याकडे लक्ष देऊन हा प्रकार बंद करावा अशी मागणी ग्राहकांमधून होत आहे. बीड शहरामध्ये भारत गॅस कंपनीची गणराज गॅस एजन्सी आहे. अनुदान खात्यावर जमा होण्यासाठी खात्याची केवायसी करणे गरजेचे असते. यासाठी गॅस एजन्सीकडे केवायसी करावी लागते. ही केवायसी करण्यासाठी गणराज गॅस एजन्सी कडून दोन मुलांची नेमणूक करून ग्राहकांच्या घरी जाऊन ग्राहकांची केवायसी शंभर रुपये घेऊन केली जात आहे .शंभर रुपये कशासाठी घेता अशी विचारणा केली असता ही आमची फीस आहे. केवायसी करण्याची. केवायसी केली नाही तर तुमचे गॅस कनेक्शन बंद होईल असा सज्जड दम देऊन आणि ग्राहकांची दिशाभूल करून ग्राहकांकडून शंभर रुपये सक्तीने वसूल केले जात आहेत. वास्तविक पाहता केवायसी करण्याची जबाबदारी गॅस एजन्सीची आहे. मात्र यासाठी कुठलेही पैसे लागत नाहीत. गणराज गॅस एजन्सी कडून मुलांची नेमणूक करून शंभर रुपये सक्तीची वसुली कशासाठी केली जात आहे? असा सवाल केला जात असून जिल्हा पुरवठा अधिकाऱ्यांनी या प्रकाराकडे लक्ष देऊन ही सक्तीची वसुली थांबवावी. नसता ग्राहक तीव्र आंदोलन करतील असा इशारा ग्राहकांनी दिला आहे.

-------------

### काँग्रेसकडे विकासाचा

हे दरवर्षी अंदाजे १०,००० कोटी रुपयांपर्यंत वाढवले आहे. काँग्रेसकडे कोणताही अजेंडा नाही, अशी टीका पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी या ठिकाणी केली. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी रविवारी आसामच्या नागाव जिल्ह्यात ६,९५७ कोटी रुपयांच्या काझीरंगा एलिव्हेटेड कॉरिडॉर प्रकल्पाची पायाभरणी केली. त्यासोबतच दोन अमृत भारत एक्सप्रेस गाड्या डिजिटल पद्धतीने सुरू केल्या. आसामच्या दोन दिवसांच्या दौऱ्याच्या शेवटच्या टप्प्यात गुवाहाटीहून येथे पोहोचलेल्या पंतप्रधान मोदींनी काझीरंगा प्रकल्पाच्या ''भूमीपूजन'' (भूमिपूजन समारंभ) मध्ये भाग घेतला. पंतप्रधान मोदींनी काझीरंगा एलिव्हेटेड कॉरिडॉरच्या मॉडेलचीही पाहणी केली. त्यांनी दोन अमृत भारत एक्सप्रेस गाड्या डिजिटल पद्धतीने सुरू केल्या: दिब्रुगड-गोमती नगर (लखनऊ) आणि कामाख्या-रोहतक. एका अधिकाऱ्याने सांगितले की या गाड्या आसाम आणि पश्चिम बंगाल, बिहार, उत्तर प्रदेश, दिल्ली आणि हरियाणा यासारख्या विविध राज्यांमधील लांब पल्ल्याच्या रेल्वे कनेक्टिव्हिटीमध्ये लक्षणीय सुधारणा करतील, प्रवासाचा वेळ कमी करतील आणि आधुनिक प्रवाशांच्या सुविधा उपलब्ध करून देतील. गेल्या काही वर्षांत काझीरंगाला येणाऱ्या पर्यटकांची संख्या सातत्याने वाढत आहे असे पंतप्रधान मोदी म्हणाले. स्थानिक तरुणांना होमस्टे, मार्गदर्शक सेवा, वाहतूक, हस्तकला आणि लहान व्यवसायांद्वारे उत्पन्नाचे नवीन स्रोत सापडले आहेत. आज, मी आसाममधील लोकांचे आणि येथील सरकारचे आणखी एका गोष्टीसाठी विशेषतः कौतुक करू इच्छितो. एक काळ असा होता जेव्हा काझीरंगामध्ये गेंड्यांची शिकार ही आसाममध्ये एक मोठी चिंता बनली होती. २०१३-१४ मध्ये, डझनभर एकशिंगी गेंडे मारले गेले. भाजप सरकारने हे आता सहन केले जाणार नाही असा निर्णय घेतला. त्यानंतर, आम्ही सुरक्षा व्यवस्था मजबूत केली. पंतप्रधान मोदी म्हणाले की, आजच्या मतदारांना सुशासन, विकास आणि विकास आणि वारसा या दोन्हींवर लक्ष केंद्रित करायचे आहे, म्हणूनच ते भाजपला पसंती देतात. या निवडणुकांमधून आणखी एक संदेश मिळतो: देश काँग्रेस पक्षाच्या नकारात्मक राजकारणाला सातत्याने नाकारत आहे. मुंबई शहरात, जिथे काँग्रेसचा जन्म झाला, तो आता चौथ्या किंवा पाचव्या क्रमांकाचा पक्ष बनला आहे. ते पुढे म्हणाले की, दोन वर्षांपूर्वी काझीरंगामध्ये घालवलेले क्षण त्यांच्या आयुष्यातील सर्वात खास अनुभवांपैकी एक आहेत. त्यांना काझीरंगाच्या राष्ट्रीय उद्यानात रात्र घालवण्याची संधी मिळाली आणि दुसऱ्या दिवशी सकाळी हत्ती सफारी दरम्यान त्यांनी या प्रदेशाचे सौंदर्य जवळून अनुभवले. आसाममध्ये येण्याचा त्यांना नेहमीच एक विशेष आनंद वाटतो. ही भूमी वीरांची भूमी आहे, प्रत्येक क्षेत्रात आपली प्रतिभा दाखवणाऱ्या पुत्र-मुलींची भूमी आहे.

--------------

### जम्मू काश्मीरमध्ये ५० पैकी ४२ विद्यार्थी मुस्लिम

अफवा पसरवण्यात आल्या. कोणतीही चौकशी, नोटीस किंवा सुनावणी न करता प्रशासनाने थेट बुलडोझर चालवून शाळा पाडली. या प्रकरणात अधिकाऱ्यांवर कोणाचा दबाव होता, असा सवालही त्यांनी उपस्थित केला. डॉ. हुसेन यांनी जम्मू-काश्मीरमधील श्री माता वैष्णो देवी मेडिकल कॉलेजचा मुद्दाही उपस्थित केला. नीट परीक्षेच्या आधारे प्रवेश झाले असून अंतिम यादीत ५० पैकी ४२ विद्यार्थी मुस्लिम असल्याने कॉलेजची मान्यता रद्द करण्यात आली, असा आरोप त्यांनी केला. सप्टेंबर २०२५ मध्ये परवानगी देताना पायाभूत सुविधा व नियमांची तपासणी झाली नव्हती का, असा सवाल करत राष्ट्रीय वैद्यकीय आयोगाचाही गैरवापर होत असल्याचा आरोप त्यांनी केला. श्री माता वैष्णो देवी वैद्यकीय महाविद्यालय पुन्हा सुरू करण्याची आणि बैतूलमधील शाळा पुनर्बांधणीची व दोन्ही प्रकरणांची उच्चस्तरीय चौकशी करावी आणि बुलडोझर संस्कृती व द्वेषपूर्ण राजकारण थांबवावे, अशी मागणीही करण्यात आली आहे. शिक्षण क्षेत्रातील तणावपूर्ण वातावरणाचा उल्लेख करत त्यांनी कर्नाटक, आसाम आणि उत्तर प्रदेशातील घटनांचा दाखला दिला. शिक्षण संस्थांचे खुलेआम भगवेकरण होत असून जामिया मिलिया इस्लामिया, अलीगड मुस्लिम विद्यापीठ आणि जेएनयूच्या निधीत मोठ्या प्रमाणावर कपात झाल्याचे त्यांनी सांगितले. या परिस्थितीमुळे देशात 'ब्रेन ड्रेन' वाढत असल्याचीही चिंता त्यांनी व्यक्त केली.

---------------

### विजय भाजपाचा की

समजले नाही ज्यांनी साठ वर्ष राजकारण केले त्या शरद पवारांना देखील देवा भाऊ वरचढ असल्याचे आज दिसून आले पुणे आणि पिंपरी चिंचवड हा पवारांचा बालेकिल्ला मात्र तिथे दोन्ही पवारांना एकत्र होऊनही भाजपाला पराभूत करणे शक्य झाले नाही मात्र निवडणुकीपूर्वी भाजपने केलेली खेळी भाजपच्या फायद्याची ठरली हे पुणे आणि पिंपरी चिंचवड महापालिकेच्या निवडणुकीमध्ये दिसून आल्याचे म्हणावे लागेल लातूर महापालिकेमध्ये प्रदेशाध्यक्ष स्व. विलासराव देशमुख यांच्या बद्दल बोलले त्याचा राग मतदाराच्या मनात परंतु ते तसे बोलले नसते तरी देखील तेथील जनतेच्या मनात विलासराव देशमुख यांच्या विषयी आदर आहे म्हणून त्यांनी त्यांनाच मते दिली. असे असतानाही तेथे भाजपाने चांगले यश मिळवले असे म्हणावे लागेल तेव्हा विषय हा येतो हा विजय भाजपाचा आहे की मुख्यमंत्री फडणवीस यांच्या रणनीतीचा शेवटी पक्ष हा प्रमुख असला तरी रणनीती ठरवणारा पक्षाला यश मिळवून देतो त्यामुळे देवा भाऊंचा करिष्मा चालला हे नाकारता येणार नाही

------------

cmyk

दैनिक
# राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार.....
सोमवार दि. १९ जानेवारी २०२६


## थोडक्यात



बीड : ॲड. गोविंद नवनाथ शिराळे पाटील यांची बीड नं. प. स्वीकृत नगरसेवक पदी निवड झाल्याबद्दल अभिनंदन करतांना सोबत भाजपा नेते तथा बीड जिल्हा उपाध्यक्ष नवनाथ अण्णा शिराळे पाटील,लोकशाही पत्रकार संघांचे राष्ट्रीय अध्यक्ष भागवत (बीबी ) वैद्य, बीड जिल्हा संघटक संजय देवा कुलकर्णी,बांधकाम मिस्त्री शेख चांद हे दिसत आहेत.

## जनगणना २०२७ पूर्वतयारीसाठी प्रशिक्षण कार्यशाळा संपन्न

बीड । प्रतिनिधी

भारताच्या १६ व्या राष्ट्रीय जनगणना २०२७ च्या पूर्वतयारीसाठी जिल्हाधिकारी कार्यालय, बीड येथे दिनांक १५ जानेवारी २०२६ रोजी प्रशिक्षण कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यशाळेत जनगणना संचालनासाठी आवश्यक असलेल्या तयारीबाबत सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले.या प्रशिक्षण कार्यक्रमाला सहाय्यक संचालक जनगणना प्रविण भगत व अरुण साळवेकर (सांख्यिकी) यांनी उपस्थित राहून मार्गदर्शन केले. कार्यशाळेत निवासी उपजिल्हाधिकारी, शिवकुमार स्वामी तसेच उपजिल्हाधिकारी शैलेश सूर्यवंशी यांच्यासह उपविभागीय अधिकारी, तहसीलदार, नगरपरिषद मुख्याधिकारी, गट विकास अधिकारी, मंडळ अधिकारी, नगरसेवक तसेच जनगणना विभागाशी संबंधित अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.यावेळी आगामी जनगणनेसाठी डिजिटल पद्धतीने माहिती संकलन करण्यात येणार असून मोबाईल ॲप्लिकेशनच्या वापराद्वारे माहिती भरण्याची प्रक्रिया राबविण्यात येणार असल्याची माहिती देण्यात आली. तसेच जनगणना कार्यासाठी आवश्यक मनुष्यबळ नियोजन, प्रशिक्षण व्यवस्था व कार्यपद्धती यावर सविस्तर चर्चा करण्यात आली. जनगणना समन्वयाच्या कामासाठी एक केंद्रीय संगणक कार्यान्वित पोर्टल राहणार आहे.जनगणना प्रक्रिया दोन टप्प्यांत राबविण्यात येणार असून पहिला टप्पा घरगुती गणना मे/जून २०२६ दरम्यान तर दुसरा टप्पा फेब्रुवारी-मार्च २०२७ दरम्यान होणार असल्याचे सांगण्यात आले.जनगणना हे अत्यंत महत्त्वाचे व संवेदनशील कार्य असल्याने सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांनी प्रशिक्षणात दिलेल्या सूचनांचे काटेकोर पालन करून काम करावे, असे निर्देश उपजिल्हाधिकारी (सा.प्र. ) शैलेश सूर्यवंशी यांनी दिले.

## कापूस आयात शुल्कात सूट दिल्यास शेतकरी हक्क मोर्चा रस्त्यावर उतरेल -राजेंद्र आमटे

बीड । प्रतिनिधी



कॉन्फेडरेशन ऑफ इंडियन टेक्स्टाईल इंडस्ट्री (CITI) च्या मागणीनुसार केंद्र सरकारने यापूर्वी कापूस आयातीवरील ११ टक्के आयात शुल्क माफ केले होते. या निर्णयामुळे राज्यासह देशातील कापूस उत्पादक शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले असल्याचा आरोप शेतकरी हक्क मोर्चाच्या वतीने करण्यात आला आहे. सरकारने व्यापारीधोरण अवलंबून मोजक्या टेक्स्टाईल उद्योगपतींच्या फायद्यासाठी कापूस आयात शुल्क माफ करून देशातील शेतकऱ्यांना देशोधडीला लावण्याचे काम केले, असा घणाघाती आरोप शेतकरी हक्क मोर्चाने केला आहे. ३१ डिसेंबरनंतर पुन्हा कापूस आयातीवर शुल्क लागू झाले असताना, आता पुन्हा सीआयटीआयने सरकारकडे आयात शुल्कात सवलत देण्याची मागणी केली आहे. सरकारने पुन्हा एकदा कापूस आयात शुल्कात सवलत दिल्यास शेतकरी हक्क मोर्चा तीव्र आंदोलन छेडेल व शेतकरी रस्त्यावर उतरण्यास भाग पाडले जातील, असा इशारा मोर्चाच्या वतीने देण्यात आला आहे.भारत हा कृषीप्रधान देश असून, शेतीवर आधारित अर्थव्यवस्थेचा कणा शेतकरी आहे. त्यामुळे व्यापाऱ्यांचे हित न पाहता शेतकऱ्यांचे हित जपण्याची जबाबदारी सरकारची आहे. कापसावरील सध्याचे ११ टक्के आयात शुल्क माफ न करता ते वाढवून किमान २२ टक्के करण्यात यावे, अशी ठाम मागणी शेतकरी हक्क मोर्चाच्या वतीने करण्यात आली आहे. जर सरकारने पुन्हा कापूस आयात शुल्कात सूट लागू केली, तर शेतकरी रस्त्यावर उतरण्याशिवाय पर्याय राहणार नाही, याची गंभीर दखल सरकारने घ्यावी, असा इशारा शेतकरी हक्क मोर्चाचे शेतकरी पुत्र राजेंद्र आमटे यांनी दिला आहे.

# उद्या गोरक्षनाथ टेकडी येथे ७५ व्या अमृत महोत्सवी सप्ताह सांगता

## अमृततुल्य काल्याच्या कीर्तनास उपस्थित राहावे:- ह भ प गुरुवर्य शांतीब्रम्ह नवनाथ बाबा महाराज

बीड । प्रतिनिधी

विसाव्या शतकातील महान संत श्री ह भ प वैकुंठवासी सद्गुरु किसन बाबा महाराज श्री क्षेत्र गोरक्षनाथ टेकडी यांच्या कृपाशीर्वादाने व ह भ प गुरुवर्य शांती ब्रह्मा नवनाथ बाबा महाराज मठाधिपती श्री क्षेत्र गोरक्षनाथ टेकडी यांच्या कुशल मार्गदर्शनाखाली आयोजित ७५ वा अमृत महोत्सवी वर्ष धर्मनाथ बीज अखंड हरिनाम सप्ताह सांगता उद्या दिनांक २० जानेवारी २०२ २६ रोजी मंगळवारी सकाळी १० ते ११ या वेळेत ह भ प शांतिब्रह्म नवनाथ बाबा महाराज मठाधिपती श्री शेत्र गोरक्षनाथ टेकडी यांचे भाविक भक्तांना धर्मनाथ बीज निमित्त प्रवचन होईल त्यानंतर दुपारी १२ ते ०२ या वेळेत ह भ प अक्रूर महाराज साखरे गेवराई यांच्या अमृततुल्य काल्याच्या कीर्तनाने होईल व नंतर महाप्रसादाच्या महापंक्ती होतील तरी जास्तीत जास्त भाविक भक्तांनी याचा लाभ घ्यावा असे आव्हान गुरुवर्य शांती ब्रह्म नवनाथ बाबा महाराज यांच्या वतीने करण्यात येत आहे

गुरुवर्य किसन बाबा महाराज यांनी सुरू केलेल्या धर्मनाथ बीज निमित्त अखंड हरिनाम सप्ताहाच्या अमृत महोत्सवी वर्षाच्या



कीर्तन महोत्सवामध्ये काकडा भजन विष्णुसहस्रनाम ज्ञानेश्वरी पारायण गाथा भजन प्रवचन हरिपाठ भावार्थरामायण हरी किर्तन संगीत भजन व हरिजागर असे हरी नामस्मरणाचे भव्य कार्यक्रम संपन्न होत आहेत. गुरुवर्य वैकुंठवासी किसन बाबा महाराज यांनी ७५ वर्षांपूर्वी श्रीक्षेत्र गोरक्षनाथ टेकडी येथे धर्मनाथ बीज निमित्त अखंड हरिनाम सप्ताहाची सुरुवात केली यावर्षी हे या शब्दाचे ७५ वे वर्ष असून अमृत महोत्सवी अखंड हरिनाम सप्ताह ची सांगता उद्या संपन्न होणार आहे.

**भाविक भक्तांची व्यवस्था :** १ एकर ४ गुंठे भव्य दिव्य डोम मध्ये बसण्याची व्यवस्था २ एकर रिकामी जागा साफ करून कीर्तन वेळेत बसण्याची व्यवस्था ३) ५ एकर मध्ये मोठ्या गाड्यांची पार्किंग व्यवस्था ४)२ एकर मध्ये टू व्हिलर पार्किंग व्यवस्था

**महाप्रसाद व्यवस्था :** महाप्रसाद साठी २५ कुंटल बुंदीचा महाप्रसाद तयार करण्यास दोन दिवसापासून सुरुवात महाप्रसाद वाटपा करिता परिसरातील पिकप ची व्यवस्था व सेवकांची व्यवस्था करण्यात आलेली आहे. महापंगत बसण्याची व्यवस्था एक एकर चार गुंठे डोम दोन एकर रिकामी जागा असे एकूण तीन ते चार एकर मध्ये पण तिची बसण्याची व्यवस्था करण्यात आलेली आहे

**सांगता दिनाचे दैनंदिन कार्यक्रम :** परंपरेप्रमाणे घाटसावळी ग्रामस्थांच्या वतीने बाबांना आहेर आहे, १० ते ११ गुरुवर्य शांती ब्रह्मा नवनाथ बाबा महाराज यांचे धर्मनाथ बीज निमित्त प्रवचन, दुपारी १२ ते ०२ ह भ प अक्रूर महाराज साखरे यांचे अमृततुल्य काल्याचे कीर्तन, काल्याचे किर्तन झाल्यानंतर महाप्रसादाच्या महापंथी होतील, रात्री साडेआठ ते अकरा ह भ प रामायणाचार्य पद्मकर महाराज देशमुख अमरावती यांचे धर्मनाथ बीज निमित्त कीर्तन संपन्न होईल, रात्री ११ ते पहाटे चार वाजेपर्यंत हरी जागर संपन्न होईल

# परळी-मुंबई वंदे भारत एक्सप्रेस रेल्वे सह ईतरत्र रेल्वे सेवा सुरू करावी-चेतन सौंदळे

परळी वैजनाथ । प्रतिनिधी

परळी -मुंबई वंदे भारत एक्सप्रेस रेल्वे सुरू करण्यासह नांदेड -पनवेल एक्सप्रेस रेल्वे गाडीच्या प्रवाशी,स्लीपर तसेच ए.सी.बोगींची संख्या तात्काळ वाढवावी तसेच परळी मार्गे पुणे, मुंबई, नागपुर, तिरूपती, अयोध्या, वाराणसी, गोवा व ईतर प्रमुख ठिकाणासाठी त्वरीत रेल्वे सुरू करण्याच्या मागणीचे निवेदन सिकंद्राबाद रेल्वे विभागाचे सिनिअर डीसीएम शिफाली कुमार यांना दि.१६ जानेवारी २०२६ रोजी रेल्वे स्थानकाच्या तपासणीनिमित्त आले असताना परळी रेल्वे स्थानकात देण्यात आले.याप्रसंगी परळी मराठवाडा जनता विकास परीषद अध्यक्ष तथा माजी नगरसेवक चेतन सौंदळे,मनसे तालुकाध्यक्ष श्रीकांत पाथरकर यांच्यासह पदाधिकारी व सामाजिक कार्यकर्ते उपस्थित होते.

नांदेडहुन मुंबईला जाणा-या वंदे भारत एक्सप्रेस रेल्वेचे कनेक्शन मिळावे म्हणून परळी येथून पहाटे निघणा-या परळी- आदिलाबाद या पॅसेंजर रेल्वेची वेळ बदलावी तसेच प्रवासी जनतेच्या व्यापक हिताच्या दृष्टीने पुढील महत्वपूर्ण मागण्या देखील निवेदनात करण्यात आल्या आहेत. १)मछलीपट्टणम -बीदर, सिकंद्राबाद-बीदर इंटरसिटी एक्सप्रेस,पाटणा-पूर्णा,रायचूर-परभणी ईत्यादी रेल्वे सेवा परळी-वैजनाथ पर्यंत त्वरीत



विस्तारीत करावी. २) 'पूर्णा-परळी' रेल्वे परत जाताना बहुअंशी रिकामीच असते त्या ऐवजी ती लातूर- कुर्डवाडी किंवा उदगीर-बीदर पर्यंत विस्तारित करावी. ३)अमरावती -पुणे व कोल्हापुर-नागपुर रेल्वे नियमित कराव्यात ४)क्रॉसिंगच्या निमित्ताने घाटनांदूर,वडगाव (निळा) इत्यादी स्टेशन वर विविध गाड्या विनाकारण अधिक वेळ खोळंबून ठेवू नयेत,परळी रेल्वे स्थानकातील आरक्षण कार्यालयाची कामाची वेळ वाढवावी. ५)प्रवाशांच्या अधिक सुरक्षाकरिता आरपीएफ व जीआरपी पोलीस संख्या वाढवून संबंधित विभागाचे वरीष्ठ कार्यालय तात्काळ निर्माण करावे ६)रेल्वे स्टेशन व परीसरातील सीसीटीव्ही कॅमेरा व रेल्वे डब्ब्यांचे डिस्पले चालू ठेवणे यासह ईतर मागण्या करण्यात आल्या यावेळी डीसीम शिफाली कुमार यांनी परळी रेल्वे स्थानकातील अद्यावत सुविधा व प्रवाशांच्या सोयींकरिता करण्यात येत असलेल्या कामकाजाविषयी संवाद साधून अडचणी जाणून घेतल्या यावेळी मराठवाडा जनता विकास परीषद,परळी अध्यक्ष तथा माजी नगरसेवक चेतन सौंदळे,पदाधिकारी श्रीकांत पाथरकर,ऋषीकेश बारगजे,गजानन हालगे,निरंजन गौरशेट्टे,दीपक कुरील आदिंची उपस्थिती होती. परळी मार्गे विविध ठिकाणी रेल्वे सुरू करणे तसेच पिट लाईन यंत्रणा व रेल्वे स्थानकात अद्यावत सुविधा निर्माण करण्याचे काम रेल्वे विभागामार्फत जलद गतीने करण्याकरिताची शिफारस रेल्वे मंत्रालय व रेल्वे बोर्डाकडे पाठविण्याचे आश्वासन शिफाली कुमार यांनी शिष्टमंडळास दिला आहे.

पान ६ वरुन...

## निराधार योजनेत

सखोल चौकशी करण्यात यावी, अशी मागणी करण्यात आली आहे.मयत लाभार्थ्यांची स्वतंत्र नोंद प्रशासनाकडे आहे की नाही, तसेच आधार व मतदान कार्ड लिंक का केले जात नाहीत, याबाबतही त्यांनी प्रश्न उपस्थित केले आहेत. विशेष म्हणजे, इतर तालुका अथवा जिल्ह्यातील रहिवाशांचे अनुदान आपल्या तहसीलमार्फत सुरू असल्याचे प्रकारही उघडकीस येत आहेत, असा आरोप करत शासनाच्या कोट्यवधी रुपयांच्या निधीचा अपव्यय होत असल्याचा गंभीर दावा सलीम बापू यांनी केला आहे. याचा जाब विचारण्यासाठी येत्या २० जानेवारी २०२५ रोजी तहसील कार्यालया समोर आमरण उपोषणाचा इशारा सामाजिक कार्यकर्ते सलीम बापू यांनी दिला आहे

## सडक सुरक्षा अभियान

कशी काळजी घ्यावी याची सविस्तर माहिती दिली.

अध्यक्षीय समारोप सैनिकी विद्यालयाचे प्राचार्य श्री सचिन पवार सर यांनी केला . त्यांनी सडक सुरक्षा बद्दल विस्तृत अशी माहिती दिली. सडक सुरक्षा नियमाबद्दल शपथ घेऊन कार्यक्रमाची सांगता करण्यात आली. यावेळी विद्यालयातील सर्व प्राध्यापक शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.

## महिलांच्या हाती आता

१,००० कोटी रुपयांचे वितरण गावपातळीवर गोरगरिबांपर्यंत झाले आहे. आर्थिक व्यवस्था मजबूत करणे हेच गरिबी निर्मूलनाचे प्रमुख साधन आहे. बालविवाहाचे मुख्य कारण गरिबी असून, ती दूर करण्यासाठी आर्थिक सबलीकरण आवश्यक आहे, असे मत त्यांनी व्यक्त केले.यावेळी जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे सचिव सय्यद वहाब यांनी आपल्या मनोगतातून विधी सेवा योजनांची माहिती दिली. पाटोदा वकील संघाचे अध्यक्ष ॲड. बी. आर. लवूळ यांनी आयोजनाची संधी दिल्याबद्दल आभार मानले. पाटोदा न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश एम. एस. शिंदे यांनी आभारप्रदर्शन केले. या कार्यक्रमास जिल्ह्यातील सर्व प्रमुख न्यायाधीश, अपर पोलीस अधीक्षक सचिन पांडकर, प्रशिक्षणार्थी पोलीस अधीक्षक राहुल कुमार, उपविभागीय अधिकारी श्रीमती वसीमा शेख, तहसीलदार दत्तात्रय निलावाड, मुख्याधिकारी अभय कुमार जोशी, पाटोदा नगराध्यक्षा दिपाली जाधव, गटविकास अधिकारी उद्धव सानप, गटशिक्षणाधिकारी हनुमंत गव्हाणे, पोलीस निरीक्षक विनोद घोळवे, विविध प्रशासकीय विभागांचे प्रमुख, बँक अधिकारी, नागरिक, विद्यार्थी व वकील बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी सर्व मान्यवरांचा पाटोदा वकील संघाच्या वतीने सन्मान करण्यात आला. पाटोदा शहरात मागील अनेक दिवसांपासून या भव्य दिव्य प्रशासकीय महाशिबिराची जय्यत तयारी सुरू होती. संत दादा पाटील महाविद्यालयाच्या प्रशस्त प्रांगणात हा कार्यक्रम पार पडला. प्रशासनासह सर्वसामान्य नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थिती लावली. अत्यंत शिस्तबद्ध आणि न्यायालयीन सुसंस्कृतीत हा कार्यक्रम पार पडला.

महिला बचत गट, दिव्यांग बांधव, वन विभाग, शेतकरी लाभार्थी, घरकुल लाभार्थी अशा विविध योजनांच्या लाभार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते प्रातिनिधिक स्वरूपात लाभांचे वितरण करण्यात आले. सुमारे १४ ते १५ विभागांचे तसेच महिला बचत गटांचे माहिती स्टॉल्स लावण्यात आले होते. मान्यवरांनी या स्टॉल्सची पाहणी करून समाधान व्यक्त केले.

सांस्कृतिक सादरीकरण

कार्यक्रमाच्या सुरुवातीला जरेवाडी येथील विद्यार्थ्यांनी स्वागतगीत सादर केले. पाटोदा येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेच्या विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या कला गीताने उपस्थितांची मने जिंकली. बीड येथील रामराव आवर्गावकर विधी महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी 'मौन सोडा' हे पथनाट्य अत्यंत प्रभावी आणि आक्रमक शैलीत सादर केले. या सर्व कलाकारांचा मान्यवरांच्या हस्ते सन्मान करण्यात आला.

## महिला क्रिकेट सामन्यात

क्षीरसागर यांनी चेंडू सीमापार टोलवुन संघाच्या विजयावर शिक्कामोर्तब केले. गो.कुं.यो.कन्या विद्यालयाच्या संघाने ०९.४ षटकात तीन बाद १०१ धावा फटकावत विजय साकारला.

दे.बा.गणगे प्रा.यो. विद्यालयाच्या सीमा उनवणे,रूपाली पुस्कर य सलामीच्या जोडीने दहा षटके खेळून शंभर धावा संघाच्या खात्यात जमा केल्या.हेच आव्हान गो.कुं यो.कन्या विद्यालयाच्या महिला संघांने सहज पेलत विजय मिळविला. सामन्याचे समालोचन पतसंस्थेचे अध्यक्ष बालासाहेब मस्ने,सचिव राजू साळवी, हेमंत धानोरकर,चत्रभूज ढेंबरे यांनी केले.योगेश्वरी शिक्षण संस्था कर्मचारी पगारदार संस्थेच्या वतीने कै.कमलाकर पसारकर स्मृती महिला क्रिकेट सामन्यासाठीचे नाणेफेक यो.शि.संस्थेच्या संचालिका ऍड. कल्याणी विर्धे यांच्या हस्ते झाले.यावेळी पतसंस्थेचे पदाधिकारी इतर मान्यवर उपस्थित होते.

## उपमुख्यमंत्री एकनाथजी

उमेश चाळक यांनीही शिवसेनेत जाहीर प्रवेश केला. ग्रामपंचायत स्तरापासून युवक संघटनांपर्यंत प्रभाव असलेले नेतृत्व एकाच वेळी पक्षात सामील झाल्याने केज मतदार संघात शिवसेनेला अधिक बळ मिळाले आहे असे जिल्हा प्रमुख सचिन मुळूक यांनी सांगितले.उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखाली शिवसेना ही केवळ सत्ताधारी पक्ष न राहता जनतेच्या प्रश्नांवर निर्णयक्षम नेतृत्व देणारी ताकद बनली असल्याचे या प्रवेशातून स्पष्ट होत आहे. आगामी स्थानिक स्वराज्य संस्था व विधानसभा राजकारणाच्या पार्श्वभूमीवर हा प्रवेश केज मतदारसंघासाठी निर्णायक ठरणार आहे.

## बालविवाह रोखण्यासाठी

प्रबोधनाची चळवळ असून स्वयंसेवकांनी सामाजिक परिवर्तनासाठी सक्रिय सहभाग घेत आहेत. असे सांगितले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कु. गुंजन धापसे हीने केले. प्रास्ताविक प्रा. डॉ. संगीता आहेर यांनी तर आभार प्रदर्शन कु. बागवान हुमेरा हीने मानले. या कार्यक्रमास ग्रामस्थ व स्वंयसेविका उपस्थित होत्या.

# शासकीय रेखा कला परीक्षेत महात्मा फुले माध्यमिक विद्यालयाचे घवघवीत यश

### इंटरमिजीएट परीक्षेत प्रसेनजित अमर साळवे 'अ' श्रेणीत उत्तीर्ण

माजलगाव । प्रतिनिधी

महाराष्ट्र राज्य कला संचालनालयाच्या वतीने २०२५ मध्ये घेण्यात आलेल्या एलेमेंटरी व इंटरमिजीएट शासकीय रेखा कला परीक्षेचा निकाल नुकताच जाहीर झाला असून, नवविकास मंडळ संचलित महात्मा ज्योतिबा फुले माध्यमिक विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी घवघवीत यश संपादन केले आहे.

या दोन्ही परीक्षांमध्ये विद्यालयाचा १०० टक्के निकाल लागला आहे. इंटरमिजीएट परीक्षेत इयत्ता नववीतील विद्यार्थी चि. प्रसेनजित अमर साळवे याने 'अ' श्रेणीत यश



संपादन केले. तसेच एलेमेंटरी परीक्षेत इयत्ता आठवीतील विद्यार्थिनी कु. समृद्धी सुनील मोताळे हिने 'अ' श्रेणी प्राप्त करून विद्यालयाचा नावलौकिक वाढवला आहे.

एलेमेंटरी परीक्षेत राजनंदिनी उगले, गायत्री काटे, कल्याणी काटकर, भाग्यश्री शिंदे, स्वप्नील थोरात, सय्यद सायमा या विद्यार्थ्यांनी यश मिळवले. तर इंटरमिजीएट परीक्षेत रेणुका हाके व सुहाना शेख या विद्यार्थिनींनी यशस्वी कामगिरी केली. या सर्व विद्यार्थ्यांना आर. एस. शिवणकर व ए. बी. भाले या शिक्षकांचे मार्गदर्शन लाभले. या उल्लेखनीय यशाबद्दल नवविकास मंडळाचे अध्यक्ष एस. आर. शर्मा, कार्यवाह तथा माजी शिक्षक आमदार डी. के. देशमुख, उपाध्यक्ष आर. डी. भिलेगावकर, सहकार्यवाह आर. बी. देशमुख, संचालक शिरीष देशमुख, डॉ. सचिन देशमुख, राहुल मुळी, मुख्य प्रशासकीय अधिकारी तथा मुख्याध्यापक ए. आर. इबिते, मुख्याध्यापक के. एल. मोताळे, पर्यवेक्षक एस. एस. देशमुख यांच्यासह सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी विद्यार्थ्यांचे व मार्गदर्शक शिक्षकांचे अभिनंदन केले आहे.

# रासेयो स्वयंसेवकांनी स्वत:तील कौशल्यांचा विकास करणे गरजेचे-अशाबोद्दीन शेख

किल्ले धारुर । प्रतिनिधी

रासेयो स्वयंसेवकांनी स्वता:तील कौशल्यांना ओळखून त्यांच्या विकास करणे गरजेचे आहे. आपल्यासमोर भारतरत्न सचिन तेंडुलकर, लता मंगेशकर यांचे आदर्श आहेत. यामुळे प्रत्येक स्वयंसेवकाने स्वतःतील क्षमता ओळखून जीवनात यशस्वी झाले पाहिजे असे उद्गार रासेयोजनेच्या उद्घाटकिय मनोगतातून दै. चंपवातिपत्रचे वार्ताहर अशाबोद्दीन शेख यांनी केले. राजमाता जिजाऊ महाविद्यालयाचे राष्ट्रीय सेवा योजनेचे विशेष वार्षिक शिबिर मौजे अंजनडोह येथे दिनांक १७ ते २३ जानेवारी २०२६ रोजी संपन्न होत आहे. अध्यक्षीय समारोपातून महाविद्यालय विकासाचा समितीचे निमंत्रित सदस्य डॉ. राम शिनगारे यांनी धारूर परिसरामध्ये होणारा पाऊस अल्प आहे. त्यामुळे समाजामध्ये पाण्याच्या समस्या निर्माण होतात. या समस्यांतून खेडी मुक्त होण्यासाठी स्वयंसेवकांनी पाणलोट क्षेत्र, जलसंधारण या स्वरूपाची कामे करून समाजासमोर आदर्श निर्माण करावा असे सांगितले. प्रमुख अतिथी धारूर तालुका पाणी फाउंडेशनचे श्री. नितीन पाटोळे यांनी शाश्वत विकास होण्यासाठी जलसंधारण, पाणलोट क्षेत्र, निसर्गाचे संवर्धन व जतन यासंबंधी मार्गदर्शन केले. प्राचार्य डॉ. गोपाळ काकडे यांनी क्षेत्रात सहभागी सर्व स्वयंसेवकांना शुभेच्छा दिल्या. खेड्यातील संस्कृती आणि संस्कार युवाशक्तीने आत्मसात करून खेड्याकडे आकर्षित झाले पाहिजे. खेडी स्वयंपूर्ण होण्यासाठी शिबिरातून स्वयंसेवकांनी प्रयत्न करावेत असे सांगितले. गावातील माजी विद्यार्थी नोकरीस लागल्या निमित्ताने ज्योतीराम रामराव कांबळे, अविनाश कसपटे, आदित्य रेपे, शकील अल्लाउद्दीन शेख, शुभम आडे या विद्यार्थ्यांना सन्मानित करण्यात आले. महाविद्यालय विकास समितीचे निमंत्रित सदस्य मा. श्री. इं. ना. जाधव, सरपंच मा. पी. एस. सोळंके, ग्रामविकास अधिकारी एस. एस. साखरे, धारुर शहराचे स्वीकृत नगरसेवक श्री. मयूर सावंत, पत्रकार अविनाश जगताप, उपप्राचार्य प्रा. एम. ए. जोगडे, उपप्राचार्य मेजर डॉ. मिलिंद गायकवाड उद्घाटन समारंभाची सुरूवात राजमाता जिजाऊ व राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या प्रतिमा पूजनाने करण्यात आली. कार्यक्रमाधिकारी डॉ. डी. बी. जाधव यांनी या शिबिराच्या माध्यमातून गावामध्ये होणाऱ्या विविध उपक्रमांचे स्वरूप सांगितले. उद्घाटन समारंभाचे सूत्रसंचालन डॉ. विजयकुमार कुंभारे यानंतर आभार प्रा. बालासाहेब जोगदंड यांनी मानले. या समारंभास किल्लेधारूर शहर व परिसरातील ग्रामस्थ, रासेयो स्वयंसेवक यांची उपस्थिती मोठ्या संख्येने होती.



# राष्ट्रमाता जिजाऊ व शिक्षण ज्योती सावित्रीबाई जन्मोत्सवानिमित्त दिंद्रुड येथील केंद्रीय प्राथमिक शाळेत विविध कार्यक्रम संपन्न

दिंद्रुड । प्रतिनिधी

राष्ट्रमाता जिजाऊ माँसाहेब व क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जन्मोत्सवानिमित्त लेक वाचवा, लेक शिकवा अभियान अंतर्गत येथील जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक (कन्या-मुलांची) शाळेने केंद्रस्तरीय स्पर्धा राबवत विविध कार्यक्रमांचे आयोजन केले होते. काल शुक्रवारी (दि.१६) वक्तृत्व, गीतगायन व सांस्कृतिक कार्यक्रम झाल्यानंतर पुरस्कार वितरणाने या कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

दिंद्रुड (ता.माजलगाव) केंद्रातील चौदा शाळांनी या उपक्रमात उस्फुर्त सहभाग नोंदवला होता. या सर्व स्पर्धांमधील गुणवंत विद्यार्थ्यांचा पुरस्कार वितरण सोहळा शुक्रवारी दुपारी संपन्न झाला. याप्रसंगी अध्यक्षस्थानी माजी सरपंच अजय कोमटवार तर देवदूत प्रतिष्ठानचे अध्यक्ष बंडू खांडेकर उद्घाटक म्हणून उपस्थित होते. सामाजिक कार्यकर्ते सचिन फपाळ, दिंद्रुड पत्रकार संघाचे अध्यक्ष अमोल




ठोंबरे, संतोष स्वामी, दादासाहेब वकरे, नवनाथ कांबळे, बाबासाहेब देशमाने, केंद्रप्रमुख अमृत कुलकर्णी, मुख्याध्यापक मंचक सोळंके, वचिष्ट मुंडे यांची प्रमुख उपस्थिती या प्रसंगी होती. ३ जानेवारी ते १२ जानेवारी या काळात आयोजित केंद्रस्तरीय स्पर्धेतील विद्यार्थ्यांच्या वैयक्तिक स्पर्धेत धावणे, लांब उडी, उंच उडी, मुलींसाठी दोरीवरच्या उड्या व सांघिक मध्ये शंभर मीटर रिले, कबड्डी, खो-खो, लंगडी सांस्कृतिक कार्यक्रमात वकृत्व स्पर्धा, गीत गायन, नृत्य स्पर्धा, बौद्धिक स्पर्धेत सामान्य ज्ञान स्पर्धा आदी विविध उपक्रमात १४ शाळेच्या एकूण ७६५ विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला व यातून प्रथम क्रमांकाने ४०, द्वितीय क्रमांक १४० तर तृतीय क्रमांकाने १८ विद्यार्थ्यांनी यश मिळवले. या सर्व विद्यार्थ्यांना वैयक्तिक खेळामध्ये प्रथम क्रमांकासाठी गोल्ड मेडल द्वितीय क्रमांकासाठी सिल्वर मेडल व तृतीय क्रमांकासाठी ब्रांझ मेडल व प्रत्येकाला प्रशस्तीपत्र देऊन मान्यवरांच्या हस्ते गौरविण्यात आले आणि सांघिक खेळात ट्रॉफी व प्रमाणपत्र देऊन सन्मानित करण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मनोहर कटारे यांनी प्रस्ताविक परशुराम कटारे यांनी तर जया मुंडे यांनी आभार मानले. यावेळी विविध स्पर्धांचे उत्कृष्टपणे आयोजन केल्याबद्दल पत्रकार संघ, शालेय समिती व ग्रामस्थांच्या वतीने मनोहर कटारे यांचा विशेष सत्कार करण्यात आला. १४ शाळेच्या शिक्षकवृंदांचे परिश्रम, माता-पालकांच्या प्रतिसादामुळे विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव मिळत असल्याचे समाधान उपस्थित मान्यवरांनी बोलताना व्यक्त केले.

क्रीडा स्पर्धा, सामान्य ज्ञान व सांस्कृतिक कार्यक्रमां मध्ये ज्या शाळेला सर्वांत जास्त पारितोषिके मिळतील त्या शाळेला सर्वोत्कृष्ट शाळा या वर्षीपासून फिरते ढाल देण्याचा उपक्रम दिंद्रुड केंद्रांतर्गत सुरू करण्यात आला आणि या उपक्रमाचा पहिला मानकरी दिंद्रुडची जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळा (कन्या) ही ठरली. केंद्रातील सर्वं शाळेच्या मुला-मुलींनी इतर शाळांना लाजवेल असे अत्यंत उत्कृष्ट अभिनय सादर केले.

# ओंकार साखर कारखाना प्रायव्हेट लिमिटेड पांगरी परळी चे ऊस वजन काटे अचूक

परळी । प्रतिनिधी



दिनांक १६ जानेवारी २०२० रोजी सायंकाळी ओमकार साखर कारखाना प्रायव्हेट लिमिटेड युनिट आठ पांगरी तालुका परळी जिल्हा बीड या कारखान्यास श्री जी एम कांबळे उपनियंत्रक वैध मापन शास्त्र बीड मिसाळ निरीक्षक वैधमापन शास्त्र गेवराई श्री व्ही एम चीटटलवाड निरीक्षक वैध मापनशास्त्र पाटोदा श्री डी एल शिंदे निरीक्षक वैद्यमापन शास्त्र परळी एस ए सोळंके निरीक्षक वैधमापन शास्त्र बीड वजन काटा तपासणी भरारी पथक अचानक भेट देऊन वजन काट्याची तपासणी केली, असता वजन काटा तंतोतंत असल्याचे प्रमाणपत्र दिले. माननीय चेअरमन बाबुरावजी बोत्रे पाटील यांनी उसाचे वजन शेतकऱ्यांनी कोणत्याही काट्यावरून करून आणा, असे जाहीर सांगितले होते. सदरील तपासणी शेतकरी, वाहनचालक, कारखाना प्रतिनिधी समक्ष करण्यात आली व ओंकार चा वजन काटा तंतोतंत वजनाच्या विश्वासहर्तावर शिक्कामोर्तब झाले. यावेळी कारखान्याचे जनरल मॅनेजर वैभव काशीद, व इतर सर्व खाते प्रमुख उपस्थित होते.

राज्य लोकतंत्र
शेत-शिवार
सोमवार दि.१९ जानेवारी २०२६
४

# अधिक दर हवा असेल तर मोसंबीचा योग्य बहार धरा

निसर्गतः लिंबूवर्गीय फळझाडास वर्षातून तीनदा बहार येतो. त्यापैकी पावसाळ्यात (जून-जुलै) येणाऱ्या बहारास मृग बहार (मृग नक्षत्रात) म्हणतात. पावसाळा संपल्यानंतर (ऑक्टोबरमध्ये) येणाऱ्या बहारास हस्त बहार (हस्त नक्षत्रात येणारा) तर थंडी संपतेवेळी (जानेवारी-फेब्रुवारी) म्हणजे आंब्यांना ज्या वेळेस बहार येतो तो आंबिया बहार असे तीन बहार वेगवेगळ्या ऋतुमध्ये येतात.

वरीलपैकी कोणत्या बहाराची फळे घ्यायची हे जमिनीचा प्रकार, झाडांची वाढ, उन्हाळ्यात पाण्याची उपलब्धता व बाजारातील मागणी, भाव, यावर सर्वस्वी अवलंबून असते. भारी जमिनीत आंबिया बहार तर हलक्या जमिनीत मृगबहार घेतला जातो. उन्हाळ्यात ओलीताची सोय असल्यास शेतकरी आंबिया बहार घेणे पसंत करतात.

हलक्या ते मध्यम जमिनीत फेब्रुवारीच्या दुसऱ्या पंधरवाड्यात बहार येऊन फळधारणेस सुरुवात होते. जमीन खोल व भारी असल्यास बहराचा काळ मार्चपर्यंत लांबणीवर पडण्याची शक्यता असते. परंतु मार्च महिन्यात, फेब्रुवारीच्या तुलनेत तापमान जास्त असल्यामुळे फळधारणा व्यवस्थित होत नाही व फळांची अधिक गळ होते.



पावसाळ्याची सुरुवात केव्हा होते यावर मृग बहाराचे यश अवलंबून असते. ताण कमी झाल्यास बहार फुटत नाही व ताणाचा कालावधी वाढल्यास झाडे वाळण्याची शक्यता असते. पानांचा आकार बारीक होतो आणि उत्पादन घटते. मृगबहार व त्याची फळे पावसाळ्याची दमटपणामुळे झाडावर टिकून राहतात. फळांचे उत्पादन चांगले मिळते. फळे गोड, उत्तम प्रतीची व रसरशीत असतात व रंगही चांगला येतो. म्हणून मृगबहाराला बाजारभाव सुद्धा चांगला मिळतो.

आंबे बहार : यामध्ये ताण देण्याचा काळ हा नोव्हेंबर-डिसेंबर असा असतो तर फुले येण्याचा काळ जानेवारी-फेब्रुवारी असतो आणि सप्टेंबर-ऑक्टोबर मध्ये याची काढणी येते. हा बहार खात्रीचा असतो. फळाचा रंग आकर्षक. प्रत चांगली राहते. भाव चांगला मिळतो. फळ वजनाने जास्त. बागेचे आयुष्य वाढते.

फळमाशीचा उपद्रव जास्त. मृग बहार : यामध्ये ताण देण्याचा काळ हा एप्रिल-मे असतो. तर फुले येण्याचा काळ हा जून-जुलै असतो. फेब्रुवारी-मार्च मध्ये याची काढणी येते. या बहारात फळे उत्तम दर्जाची. फळमाशीचा उपद्रव कमी. कमी पाण्यात येते. बागेचे आयुष्य घटते. फळाचा आकार लहान राहतो. बहार खात्रीचा नसतो.

हस्त बहार : यामध्ये ताण देण्याचा काळ ऑगस्ट-सप्टेंबर असा असतो. फुले येण्याचा काळ सप्टेंबर-ऑक्टोबर तर एप्रिल-मे मध्ये काढणी येते. या बहारात फळे मध्यम दर्जाची. बाग चांगली राहते. भाव चांगला मिळतो. पाण्याचा ताण बसत नाही. बहार खात्रीचा नसतो.

## वन्य प्राण्यांकडून नुकसान झाल्यास अशी मिळते भरपाई



वन्यप्राण्यांमुळे पिकांचे नुकसान झाल्यावर शेतकऱ्यांनी भरपाईसाठी अर्ज केल्यानंतर वनरक्षक, ग्राम महसूल अधिकारी, सहायक कृषी अधिकारी यांची समिती तपासणी करते. वनरक्षक पिकांचे नुकसान वन्यप्राण्यांमुळे झाले आहे का? याची शहानिशा करतो. प्राण्यांच्या पायाचे ठसे, प्राण्यांची विष्ठा, प्राण्यांचा वावर यावरून वन्यप्राणी नुकसानग्रस्त क्षेत्रात आले होते का? हे ठरवतात. ग्राम महसूल अधिकारी नुकसानग्रस्त क्षेत्र अर्ज करणाऱ्या शेतकऱ्यांचेच आहे का? हे तपासतात. ग्राम कृषी अधिकारी नुकसानग्रस्त क्षेत्र किती आणि नुकसानीची टक्केवारी किती? हे काढतात. या समितीने आपला अहवाल वनपालांमार्फत वनक्षेत्रपाल यांना पाठविल्यानंतर भरपाईची रक्कम काढली जाते. पंचनाम्यात नुकसानग्रस्त क्षेत्रात कोणते पीक आहे. नुकसानीची टक्केवारी किती याची माहिती असते. त्यावरून नुकसानग्रस्त क्षेत्रातील उत्पादनात किती गट येणार, हे काढले जाते. कृषी विभागाकडून त्यासंबंधी गावात त्या पिकाची मागील पाच वर्षे सरासरी उत्पादकता किती याची माहिती घेतली जाते. त्यानंतर पिकाच्या उत्पादनात ज्या प्रमाणात घट येणार त्याला संबंधित पिकाच्या हमीभावाच्या आधारे नुकसान भरपाई दिली जाते. वनाच्या शेजारीच नाही तर वनापासून दूर असलेले शेतामध्ये वन्यप्राणी पिकांचे नुकसान करत असतात.

पंचनाम्याचा अहवाल सादर करणे आवश्यक. अर्ज मिळाल्यापासून दहा दिवसांच्या आत पंचनाम्याचा अहवाल वनक्षेत्रपाल यांना सादर करणे आवश्यक आहे. वनक्षेत्रपाल समितीचा अहवाल प्राप्त झाल्यानंतर विशिष्ट शिफारशी व तत्काळ सहायक वनसंरक्षकाकडे पाठवतील. त्यानंतर शेतकऱ्यांना एका महिन्यात भरपाई मिळते.

## कडुनिंबावर पडणारा घातक 'डायबॅक' रोग

तेलंगणा आणि दक्षिणेकडील इतर राज्यांमध्ये गेल्या काही वर्षांपासून कडुनिंबाच्या डहाळ्या, पाने सुकणे, आणि झाड वाळणे असे दृश्य दिसत आहे. १९९० च्या दशकात उत्तराखंडमधील डेहराडून जवळील प्रदेशात या रोगाची नोंद झाली होती. त्यानंतर २०१९ मध्ये तेलंगणामध्ये 'डायबॅक' रोगाची प्रथम ओळख झाली. २०२१ साली तेलंगाना सोबतच कर्नाटक, आंध्रप्रदेश, या राज्यात या रोगाचा प्रसार वाढल्याचे निदर्शनास आले आहे.

'डायबॅक' रोगाची कारणे

कडुनिंबाच्या झाडावर येणाऱ्या या रोगाला शास्त्रीय भाषेत 'डायबॅक' असे म्हणतात. 'ट्वीग ब्लाईट' नावाने सुद्धा या रोगाला ओळखतात. फोमोप्सिस अॅझाडिराक्टे' बुरशीमुळे डायबॅक रोगाचा संसर्ग होतो. या बुरशीचा संसर्ग सर्व वयाच्या आणि आकाराच्या कडुनिंबाच्या झाडांना होतो. तज्ज्ञांच्या मते, खोडकिडीद्वारे कडुनिंबाच्या फांद्यांना छिद्रे पाडल्यानंतर या बुरशीजन्य रोगाचा प्रसार वाढतो. उच्च आर्द्रता आणि हवामानातील बदल हे देखील डायबॅक रोगाच्या बुरशीच्या प्रसारास जबाबदार आहे.

'डायबॅक' रोगाची लक्षणे

पावसाळ्याच्या सुरुवातीला या रोगाची लक्षणे दिसायला सुरुवात होते, आणि हिवाळ्याच्या सुरुवातीस रोगाची तीव्रता वाढत जाते. मर रोगामुळे कडुनिंबाच्या झाडांची पाने, डहाळे आणि फुलोरा प्रभावित होतात. पाने कोमेजतात, पिवळी आणि नंतर तपकिरी होतात, पानगळ होते, खोड आणि फांद्या गडद आणि पोकळ



होतात, शेवटी संपूर्ण झाड वाळते/मरते. उत्पादनावर दुष्परिणाम होतो. विशेषतः जुनी झाडे लवकर प्रभावित होतात व वाळतात. नवीन किंवा जास्त जुनी नसलेल्या कडुलिंबाच्या झाडांवर या रोगाचा संसर्ग कमी प्रमाणात होतो, किंवा रोगाची लागण झाली तरी अशी झाडे टिकतात.

'डायबॅक' रोगासाठी एकात्मिक नियंत्रण उपाय

या रोगावरील नियंत्रण पद्धती सोपी वाटत असली तरी आव्हानात्मक आहे. रोगास कारणीभूत असणाऱ्या बुरशीचे संक्रमण हवेतून होत असल्याने एका झाडावर नियंत्रण उपाय केल्यानंतरही शेजारच्या झाडाच्या बुरशीचे बीजाणू उपचार केलेल्या रोपाला/ झाडाला हानी पोहचवू शकतात. बरेचदा मोठ्या झाडांवर बुरशीनाशक/ कीटकनाशकाची फवारणी करणे धोकादायक ठरू शकते, कारण प्रादुर्भावीत झाडाजवळ असणारी फुलपाखरे, मित्रकिडी यासाठी ही फवारणी हानिकारक ठरते. तसेच या फवारणीमुळे पाण्याचे स्त्रोत सुद्धा दूषित होऊ शकतात. त्यामुळे प्रतिबंधात्मक आणि नियंत्रण उपायांचा योग्य प्रकारे आणि सावधगिरीने अवलंब करणे गरजेचे आहे. हा बीजजन्य आणि बीज प्रसारित रोग असल्यामुळे कडुनिंबाच्या बियांवर लागवडीपूर्वी बाविस्टीनची किंवा कार्बेन्डाझिमची बीजप्रक्रिया करावी. ट्रायकोडर्माचा वापर रोपांचे आरोग्य सुधारून त्यांची रोगप्रतिकारक क्षमता वाढविते. नियमित लक्ष ठेवता येईल अशा ठिकाणी कडुनिंबाची रोपे लावावीत, झाडांची आणि रोपांची नियमित पाहणी करावी. रोगग्रस्त झाडांच्या आणि रोपांच्या फांद्या छाटून नष्ट करावे आणि झाडाला/रोपाला बुरशीनाशक आणि कीटकनाशकांचे मिश्रण लावावे. रोगग्रस्त झाडाभोवती खड्डा खणून त्यात कीटकनाशक + बुरशीनाशक + पाण्याचे मिश्रण तयार करून ओतावे.

रासायनिक नियंत्रण उपाय : प्रोफेनोफॉस २ मिली प्रति लिटर या प्रमाणात संपूर्ण झाडावर, पानांवर फवारणी करावी. यानंतर मॅन्कोझेब ६३% + कार्बेन्डाझिम १२५ डब्ल्यूपीचे मिश्रण दुसऱ्या दिवशी फवारावे. काही संशोधनानुसार, सिस्टेनिक बुरशीनाशक कार्बेन्डाझिम ५०% हे हानिकारक रोग जनकांच्या विरूद्ध अत्यंत प्रभावी सिद्ध झाले आहे. कार्बेन्डाझिम ५०% ची पानांवर फवारणी करावी. प्रादुर्भाव झालेल्या झाडांवर १ ग्रॅम बाविस्टिन/ लिटर पाणी याप्रमाणे फवारणी करावी.

## दिन विशेष

जागतिक दिवस
जागतिक धर्म दिन

### महत्वाच्या घटना

१७७८ : कॅप्टन जेम्स कूक हा हवाई बेटांवर पोचणारा पहिला युरोपियन बनला.
१९११ : युजीन बी. इलायने सानफ्रान्सिस्कोच्या बंदरात उभ्या असलेल्या यु. एस. एस. पेनसिल्व्हेनिया या जहाजावर विमान उतरवले. जहाजावर विमान उतरण्याचा हा पहिलाच प्रसंग होता.
१९५६ : संयुक्त महाराष्ट्र चळवळीच्या वेळी मुंबईत ११४ वेळा गोळीबार
१९६४ : न्यूयॉर्क येथे वर्ल्ड ट्रेड सेंटरच्या इमारतीचे भूमिपूजन झाले.
१९७४ : इजिप्त व इस्त्राएल यांच्यात शांतता करारावर सह्या झाल्या.
१९९७ : नोर्वेच्या बोर्ग आऊसलंडने एकट्याने व कोणाच्याही मदतीशिवाय अटलांटिक महासागर पार केला.
१९९८ : मदनमोहन पूंछी यांनी भारताचे २८ वे सरन्यायाधीश म्हणुन कार्यभार सांभाळला.
१९९९ : नोबेल पारितोषिक विजेते अर्थशास्त्रज्ञ अमर्त्य सेन यांना 'भारतरत्न' हा सर्वोच्च नागरी सन्मान जाहीर.
२००५ : एअरबस ए-३८० या जगातील सर्वात मोठ्या प्रवासी विमनाचे अनावरण करण्यात आले.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१७९३ : महाराष्ट्रातील एक प्रजाहितदक्ष पण दुर्दैवी राजे प्रतापसिंह भोसले यांचे निधन. छत्रपती शाहू (दुसरे) यांचे ते थोरले चिरंजीव होत. पेशवाईच्या अस्तानंतर माऊंट स्टुअर्ट एल्फिस्टन यांनी पुन: त्यांना छत्रपतींच्या गादीवर बसवले. पाठशाळा आणि संस्कृत व मराठीबरोबरच इंग्रजी भाषेच्या अध्यापनाला त्यांनी उत्तेजन दिले. (मृत्यू:४ आक्टोबर१८४७)
१८३३ : अमेरिकन संशोधक रे डॉल्बी यांचा जन्म.
१८४२ : न्यायमूर्ती महादेव गोविंद रानडे समाजसुधारक, धर्मसुधारक, अर्थशास्त्रज्ञ व न्यायाधीश (मृत्यू:१६ जानेवारी१९०९)
१८५४ : अलेक्झांडर ग्रॅहम बेल यांचा मदतनीस तसेच त्यांचा पहिल्या दुरध्वनी संभाषणातील भागीदार थॉमस वॉटसन यांचा जन्म.
१८८९ : देवनहळ्ळी वेंकटरामनय्या गुंडप्पा तथा डी. व्ही. जी. कन्नड कवी व विचारवंत (मृत्यू:७ आक्टोबर१९७५ बंगळुरू, कर्नाटक)
१८८९ : शंकर काशिनाथ गर्गे तथा 'दिवाकर' - नाट्यछटाकार (मृत्यू:१ आक्टोबर १९३१)
१८९२ : अमेरिकन अभिनेता ऑलिव्हर हार्डी यांचा जन्म.
१९३३ : जगदीश शरण वर्मा - भारताचे २७ वे सरन्यायाधीश (मृत्यू:२२ एप्रिल २०१३)
१९५२ : वीरप्पन - चंदन तस्कर (मृत्यू:१८ आक्टोबर २००४)
१९६६ : अलेक्झांडर खलिफमान - रशियन बुद्धिबळपटू
१९७२ : विनोद कांबळी - भारतीय क्रिकेटपटू
१९९५ : साहित्यिक, कवी आणि शिक्षणतज्ज्ञ वि. द. घाटे यांचा जन्म.

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१८९३ : आत्माराम रावजी भट - कृतिशील विचारवंत, 'मराठा चेंबर ऑफ कॉमर्स अँड इंडस्ट्रीज'चे संस्थापक (जन्म:१२ मे१९०५)
१९३६ : रुडयार्ड किपलिंग - नोबेल पारितोषिक विजेते ब्रिटिश लेखक (जन्म:३० डिसेंबर १८६५)
१९४७ : कुंदनलान सैगल - गायक व अभिनेते (जन्म:११ एप्रिल १९०४)
१९६७ : कृषितज्ज्ञ डॉ. पांडुरंग सदाशिव खानखोजे यांचे निधन.
१९७१ : भारीतय वकील आणि संसद सदस्य बॅरीस्टर नाथ पै यांचे निधन.
१९९६ : एन. टी. रामाराव - तेलगू अभिनेते, दिग्दर्शक, निर्माते व आंध्रप्रदेशचे १० वे मुख्यमंत्री (जन्म:२८ मे १९२३)
२००३ : हरिवंशराय बच्चन - हिन्दी कवी (जन्म:२७ नोव्हेंबर १९०७)
२०१५ : शकुंतला महाजन तथा 'बेबी शकुंतला' - लोभसवाणे रूप, शालीन सौंदर्य आणि कसदार अभिनयाच्या माध्यमातून चित्रपटसृष्टीत अमीट अशी मुद्रा उमटविणाऱ्या अभिनेत्री.

# लागवडीनंतर केळीच्या बागेचे व्यवस्थापन

बाग स्वच्छ आणि तणमुक्त ठेवण्यासाठी नियमित कुळवणी व पिल्ले काढणे आवश्यक आहे. झाडांना आधार देऊन, रोगग्रस्त पाने काढून आणि योग्य खतांचा वापर केल्याने झाडांची वाढ सुधारते. घडाची गुणवत्ता वाढवण्यासाठी केळफूल कापणे, फवारणी आणि पॉलिथीन आवरण करणे उपयुक्त ठरते. चवळी, मुग, भुईमूग, काकडीसारखी आंतरपिके घेणे टाळावे कारण ती केळीमध्ये रोग वाढवू शकतात. केळीच्या दोन ओळींमधील मोकळ्या जागेत पॉलीइथिलीन आच्छादन केल्याने ओलावा टिकतो आणि उत्पादन वाढते.

आंतर मशागत : केळीच्या बागेत आंतरमशागत, नियमित स्वच्छता व योग्य देखभाल केल्यास उत्पादन चांगले मिळते. हवामान सतत बदलत असल्यामुळे केळीच्या बागेची योग्य काळजी घेणे खूप गरजेचे आहे. शेतकऱ्यांनी महात्मा फुले कृषी विद्यापीठाने दिलेल्या उपायांचा अवलंब केल्यास झाडांचे नुकसान कमी होऊन चांगले उत्पादन मिळवू शकतात. बाग नेहमी तणमुक्त ठेवावी. केळी बाग स्वच्छ ठेवण्यासाठी उभी-आडवी कुळवणी वेळेवर करावी. लागवडीनंतर ३ ते ४ महिन्यांपर्यंत कुळवणी करणे फायदेशीर ठरते. दर दोन महिन्यांनी टिचणी बांधणी करून



झाडांना मातीची भर द्यावी. केळीच्या मुख्य झाडाच्या खोडाच्या बाजूने उगवणारे नवीन झाड किंवा कोंब ज्याला बोलीभाषेत पिल्ले म्हणतात, त्यांना धारदार कोयत्याने नियमित काढावीत. रोगग्रस्त पाने कापून बागेबाहेर नष्ट करावीत, पण हिरवी पाने कापू नयेत. झाडे पडू नयेत म्हणून गरजेप्रमाणे बांबूच्या काठ्या किंवा पॉलीप्रॉपीलीन पट्ट्यांनी झाडांना आधार द्यावा.

केळी घडाची गुणवत्ता वाढविण्यासाठी : घड पूर्ण निसवल्यावर केळफूल वेळीच कापावे. घडावर फक्त ८ ते ९ फण्या ठेवून खालच्या फण्या धारदार विळीने लवकर काढून टाकाव्यात. घड पूर्ण निसवल्यानंतर आणि त्यानंतर १५ दिवसांनी १० लिटर पाण्यात ५० ग्रॅम पोटॅशियम डायहायड्रोजन फॉस्फेट, १०० ग्रॅम युरिया आणि १० मिली स्टीकर मिसळून फवारणी करावी. केळफुल कापल्यानंतर एकदा आणि त्यानंतर ३० दिवसांनी दुसऱ्यांदा १० लिटर पाण्यात २०० ग्रॅम सल्फेट ऑफ पोटॅश मिसळून फवारणी करावी. घडांवर २% ते ६% सच्छिद्रतेच्या पांढऱ्या पॉलिथीन पिशव्यांचे आवरण करावे.

आंतरपिकांबाबतीत दक्षता : केळीबागेत चवळी, उडीद, मुग, भुईमूग, काकडी, भोपळा, कलिंगड, खरबुज, मिरची आणि वांगी यांसारखी पिके घेणे टाळावे. ही पिके घेतल्यास सीएमव्ही रोग वाढण्याचा धोका वाढतो, त्यामुळे ही पिके लावू नयेत.

केळीसाठी आच्छादनाचा वापर : केळीच्या दोन ओळींमधील मोकळ्या जागेच्या सुमारे ८०% भागावर ३० मायक्रॉन जाडीचे चंदेरी रंगाचे पॉलीइथिलीनचे आच्छादन करावे. हे आच्छादन आंतरमशागत पूर्ण झाल्यानंतर म्हणजेच नोव्हेंबर महिन्यात करणे योग्य असते.

बदलत्या वातावरणात व्यवस्थापन : बागेत साचलेले पाणी लगेच बाहेर काढावे. जर सतत पावसामुळे जमिनीतून किंवा ठिबकाने खते देणे शक्य नसेल, तर खते पाण्यात मिसळून पानांवर फवारणी करावी. जोरदार वाऱ्यामुळे केळीची पाने फाटतात आणि झाडे पडून नुकसान होते.

हे नुकसान कमी करण्यासाठी बागेभोवती दोन मीटर अंतरावर कुंपण पिकाच्या दोन ओळी लागवडीच्या वेळीच लावाव्यात. कुंपण पिकासाठी शेवरी या पिकाचा वापर करावा. थंडीच्या काळात रात्री झाडांना पाणी द्यावे. सकाळी लवकर बागेत ओला पाला आणि पाचोळा जाळून धूर करावा. झाडाच्या वयानुसार २५० ग्रॅम ते १००० ग्रॅम निंबोळी ढेप प्रती झाड द्यावी.थंडीपासून घडांचे संरक्षण करण्यासाठी सहा टक्के छिद्र असलेल्या पांढऱ्या प्लास्टिकच्या पिशवीचे आवरण करावे. उकाड्याच्या काळात झाडांना शिफारशीनुसार पुरेसे पाणी द्यावे. मातीतील ओलावा टिकवण्यासाठी बागेत केळीची पाने, गव्हाचा भुसा, ऊसाचे पाचट किंवा सोयाबीन भुसा वापरून सेंद्रिय आच्छादन करावे.

एप्रिलपासून दर पंधरा दिवसांनी १० लिटर पाण्यात ८०० ग्रॅम केओलीन मिसळून केळीच्या पानांवर फवारणी करावी.

# महसूल अधिकाऱ्यांच्या आशीर्वादानेच वाळू उत्खनन

## जिल्हाधिकारी मित्तल मॅडम महसूल अधिकाऱ्यांवर कारवाई करा

मंठा। प्रतिनिधी

मंठा तालुक्यात सुरू असलेल्या अवैध वाळू उत्खनन व वाहतुकीने महसूल प्रशासनाच्या कार्यक्षमतेवरच प्रश्नचिन्ह निर्माण झाले असून, शासनाचा महसूल, पर्यावरण आणि सामान्य नागरिकांचे जीवन तिन्हीही धोक्यात आले आहे. याप्रकरणी जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांनी महसूल अधिकारी यांची चौकशी करून बदली करण्यात यावी अशी मागणी करण्यात येत आहे. उपविभागीय अधिकारी व तहसीलदार फक्त बघायची भूमिका घेत आहे. ''प्रशासनाने एकदा ठाम निर्णय घेतला तर वाळू तस्कर शौचास देखील नदीपात्रात उतरण्याची हिंमत करत नाहीत,''ही आम्ही नजरेने पाहिलेले आहे असा घणाघाती आरोप माजी सभापती सुरेश सरोदे यांनी केला आहे. माजी सभापती सरोदे यांनी स्पष्ट शब्दांत सांगितले की, महसूल अधिकाऱ्यांची वाळू तस्करांशी आर्थिक तडजोड झाल्यानंतरच रात्रंदिवस अवैध वाळू वाहतूक सुरू असते. नदीपात्रातून बेसुमार उत्खनन करून ट्रॅक्टर, डंपर व अन्य वाहनांद्वारे वाळूची वाहतूक खुलेआम सुरू आहे. या सर्व प्रकारांकडे डोळेझाक होत असल्याने महसूल यंत्रणेच्या भूमिकेवर संशय व्यक्त होत आहे. शासनाने अधिकृतरीत्या वाळू घाटांचे लिलाव केले असतानाही केवळ प्रशासकीय प्रक्रियेचे निमित्त करून मोठ्या प्रमाणावर अवैध वाळू उत्खनन सुरू आहे.वाळू माफिया हेच लिलावधारक असल्याने प्रशासकीय अधिकाऱ्यांशी आर्थिक तडजोडी करून दरवर्षी लिलाव प्रक्रियेत अडथळा आणून वाळू साठी नागरिकांना वेठीस धरून शासनाला मिळणारा कोट्यवधी रुपयांचा गौण खनिज महसूल बुडत आहे. ''हे थेट शासनाच्या तिजोरीवर डल्ला मारण्यासारखे आहे,'' असे मत सरोदे यांनी व्यक्त केले.



स्थानिक पातळीवरील तक्रारी वाढत असतानाही तहसीलदार सुमन मोरे जालना महानगरपालिकेच्या निवडणूक कामात व्यस्त असल्याचे कारण पुढे केले जात आहे. मात्र स्थानिक जबाबदाऱ्यांकडे होत असलेल्या दुर्लक्षामुळेच वाळू माफियांना मोकळे रान मिळाले असल्याचा आरोप नागरिक व सामाजिक कार्यकर्त्यांकडून केला जात आहे. महसूल, पोलीस व खनिकर्म विभागाने संयुक्तपणे कारवाई केली असती तर परिस्थिती नियंत्रणात आली असती, असेही सांगितले जात आहे. अवैध वाळू उत्खननामुळे मंठा तालुक्यात वाळूचे दर प्रचंड वाढले आहेत. परिणामी घरकुल योजना, ग्रामीण भागातील सामान्य नागरिकांची घरे व बांधकामे ठप्प झाली आहेत. गरिबांना परवडणारी वाळू मिळेनाशी झाली असून अनेकांचे घर बांधण्याचे स्वप्न अपूर्णच राहिले आहे. ''वाळू माफियांच्या मनमानीमुळे गरिबांच्या घरांचे वासे फिरले,'' अशी तीव्र प्रतिक्रिया नागरिकांतून उमटत आहे. नदीपात्रातील बेसुमार उत्खननामुळे पर्यावरणाचे मोठे नुकसान होत आहे. नदीकाठची धूप, पाण्याची पातळी घटणे, शेती व पिण्याच्या पाण्यावर परिणाम असे गंभीर परिणाम दिसून येत आहेत. तसेच रात्री-अपरात्री सुरू असलेल्या वाहतुकीमुळे अपघातांचा धोका वाढला असून कायदा-सुव्यवस्थेचाही प्रश्न निर्माण झाला आहे. ''रात्रंदिवस माफियांनी शासनाच्या गौण खनिजाचे वान लुटले असून, या सगळ्याला जबाबदार कोण?'' असा थेट सवाल उपस्थित करत सरोदे यांनी दोषी वाळू तस्करांसह त्यांना पाठीशी घालणाऱ्या अधिकारी-कर्मचाऱ्यांवर कठोर कारवाईची मागणी केली आहे. अवैध उत्खननावर शून्य सहनशीलतेची भूमिका घेतली नाही, तर आंदोलन छेडण्याचा इशाराही त्यांनी दिला आहे.ही गंभीर बाब मंठा तालुक्याच्या सर्वांगीण विकासाशी निगडित असून, प्रशासनाने तातडीने विशेष पथक नेमून कठोर कारवाई करावी, अशी जोरदार मागणी नागरिकांकडून होत आहे.



जालना : वसुंधरा नगर, जालना येथील महिला मंडळातर्फे मा. श्री. भास्कर आबा दानवे यांची नगरसेवक पदी निवड झाल्याबद्दल यांचा सत्कार करण्यात आला व त्यांच्या पुढील सामाजिक व राजकीय वाटचालीस मनःपूर्वक शुभेच्छा देण्यात आल्या.



जालना : विप्र फाउंडेशन तर्फे नवनिर्वाचित नगरसेवक मा. श्री. भास्कर आबा दानवे यांचा सत्कार करण्यात आला. त्यांच्या पुढील महानगरपालिका चे महापूर पदी निवड होण्यास सामाजिक व राजकीय वाटचालीस शुभेच्छा देण्यात आल्या.

# पद्मविभूषण इलयाराजा यांना पद्मपाणि पुरस्कार जाहीर

छत्रपती संभाजीनगर

जगभरातील सर्वोत्कृष्ट चित्रपट मराठवाड्यातील रसिकांपर्यंत पोहोचवणाऱ्या अकराव्या अजिंठा वेरूळ आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवाची घोषणा करण्यात आलेली असून बुधवार, दि. २८ जानेवारी ते रविवार, दि. ०१ फेब्रुवारी २०२६ या दरम्यान हा महोत्सव छत्रपती संभाजीनगर येथे राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय पातळीवरील कलावंताच्या मांदियाळीत संपन्न होणार आहे. या महोत्सवात भारतीय सिनेसृष्टीतील अतुलनीय योगदानाबद्दल दिला जाणारा पद्मपाणि पुरस्कार चित्रपट संगीताला नवी दिशा देणारे ज्येष्ठ भारतीय संगीतकार, पद्मविभूषण श्री. इलयाराजा (राज्यसभा सदस्य) यांना जाहीर करण्यात आला आहे. याबाबतची घोषणा महोत्सवाचे संस्थापक व संयोजन समितीचे अध्यक्ष नंदकिशोर कागलीवाल, प्रमुख मार्गदर्शक अंकुशराव कदम व महोत्सवाचे मानद अध्यक्ष आशुतोष गोवारीकर यांनी केली आहे.

पद्मपाणि पुरस्कार निवड समितीने श्री. इलयाराजा यांची निवड केली असून या समितीच्या अध्यक्षपदी ज्येष्ठ समीक्षक लतिका पाडगांवकर तर सदस्यपदी चित्रपट दिग्दर्शक आशुतोष गोवारीकर, सुनील सुकथनकर व चंद्रकांत कुलकर्णी यांचा समावेश होता. पुरस्काराचे स्वरूप पद्मपाणि सन्मानचिन्ह, सन्मानपत्र व दोन लक्ष रूपये असे आहे.पद्मपाणि पुरस्कार प्रदान सोहळा मान्यवरांच्या हस्ते महोत्सव उद्घाटन कार्यक्रमात बुधवार, दि. २८ जानेवारी २०२६ रोजी सायंकाळी ५:३० वाजता रुक्मिणी सभागृह, एमजीएम परिसर, छत्रपती संभाजीनगर येथे होणार आहे. तर महोत्सव पुढील पाच दिवस आयनॉक्स, प्रोझोन मॉल येथे संपन्न होणार आहे.गेल्या पाच दशकांहून अधिक काळ इलयाराजा यांनी भारतीय चित्रपटसंगीतात सातत्यपूर्ण आणि सर्जनशील योगदान दिले आहे. आतापर्यंत त्यांनी ७,००० हून अधिक गाणी तसेच १,५०० पेक्षा अधिक चित्रपटांसाठी संगीत निर्मिती केली आहे. तामिळ, तेलुगू, मल्याळम, कन्नड, हिंदी, मराठी आदी विविध भारतीय भाषांमधील त्यांच्या संगीतरचनांनी रसिकांच्या मनात अढळ स्थान निर्माण केले आहे. कर्नाटकी संगीत, हिंदुस्थानी शास्त्रीय संगीत व लोकसंगीताच्या बाजावर आधारलेले, तसेच पाश्चात्त्य सिम्फनीची शिस्त लाभलेले संगीत ही त्यांची प्रमुख ओळख आहे. चित्रपटातील प्रसंगांना भावनिक खोली देणारे पार्श्वसंगीत आणि कथानकाला पूरक ठरणारी संगीतरचना हि इलयाराजा यांची प्रमुख ओळख आहे. कला, करुणा आणि सर्जनशील साधनेचे प्रतीक मानल्या जाणाऱ्या पद्मपाणि पुरस्कारासाठी इलयाराजा यांची निवड करण्यात आली आहे. त्यांच्या संगीतातील आध्यात्मिकता, शिस्त आणि मानवी संवेदनशीलतेमुळे ते जनमानसात 'इसैग्नानी' (संगीतक्षेत्रातील ऋषीतुल्य व्यक्तिमत्व) म्हणून ओळखले जातात. नाथ ग्रुप, एमजीएम विद्यापीठ व यशवंतराव चव्हाण सेंटर प्रस्तुत व मराठवाडा आर्ट कल्चर व फिल्म फाउंडेशन आयोजित अजिंठा वेरूळ आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सव हा केंद्रीय सूचना व प्रसारण मंत्रालय भारत सरकार, सांस्कृतिक कार्य विभाग महाराष्ट्र शासनाच्या सहकार्याने संपन्न होत असून प्रोझोन मॉल यांचे विशेष सहकार्य या फेस्टिव्हलला मिळालेले आहे. एनएफडीसी व महाराष्ट्र चित्रपट, रंगभूमी व सांस्कृतिक विकास महामंडळ, महाराष्ट्र शासन यांची सहप्रस्तुती असणार आहे.

# जिल्ह्यात गांवो-गांवी महिला गृह उद्योग उभारू - हस्तीमल बंब



जालना। प्रतिनिधी

जालना जिल्हा हा व्यापार आणि उद्योजकांचा जिल्हा म्हणून ओळखला जातो. व्यवसाय करीत असताना या मध्ये शहरी आणि ग्रामीण भागात महिलांचे मोठे योगदान आहे. लहान-मोठे उद्योग, गृह उद्योग मध्ये महिलांनी मोठी झेप घेतली आहे. भविष्यात ही महिलांना उद्योगासाठी मोठ्या संधी उपलब्ध आहे. शासनाचे महिलांसाठी उद्योग - व्यवसाय करिता नाम मात्र व्याजाने कर्ज उपलब्ध आहे. त्यासाठी मोठ्या प्रमाणावर अनुदान सुध्दा आहे, इच्छुक महिलांनी जिल्हा ग्राम उद्योग कार्यालयात प्रस्ताव दाखल करावे, त्यासाठी आम्ही सर्व परी सहकार्य करु. जिल्ह्यात व्यापारी संघटनेत सर्व तालुका अंतर्गत २५ महिला शाखा आहे.

उत्कृष्ठ कार्याबद्दल अनेक महिला शाखांना पुरस्कार सुध्दा देण्यात आले आहे. प्रत्येक क्षेत्रात महिला आघाडीवर आहे. जिल्ह्यात गांवो-गांवी महिला गृह उद्योग उभारुन त्यांच्या कुटुंबाला आर्थिक रित्या सक्षम बनवु असे श्री हस्तीमल बंब म्हणाले व शुभेच्छा दिल्या. जुना जालना भागातील कचेरी रोड येथील बालाजी मंदिरात दि. १७ जनवरी २०२६ शनिवार रोजी व्यापारी महासंघ महिला आघाडीच्या वतीने मकर संक्रांतीच्या निमित्ताने हल्दी-कुंकू व तीळ-गुळ वाटप भव्य कार्यक्रम उत्साहात संपन्न झाले. कार्यक्रमाचे उद्घाटन मराठवाडा विभागीय अध्यक्ष श्री बंब यांच्या हस्ते दीप प्रज्वलन करून करण्यात आले. तर कार्यक्रमाचे अध्यक्ष पदी विभागीय अध्यक्षा सौ. सिता मोहिते पाटील होत्या. प्रमुख अतिथी म्हणून संजय देशमुख, विभागीय सचिवा सौ. आनंदी अय्यर, कार्यक्रमाचे आयोजक जिल्हाध्यक्षा सौ. प्रिया जोशी, प्रमोद जोशी, राम मोहिते मंचावर उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक करताना सौ. जोशी यांनी मोठ्या संख्येने महिला उपस्थित राहिल्या बद्दल कौतुक करून सर्वांचे शब्द सुमनाने स्वागत केले व म्हणाल्या बंब साहेबाच्या नेतृत्वात महिला आघाडी संपुर्ण जिल्ह्यात महिलांना संघटीत करून उद्योग व्यवसाया करिता प्रेरित करीत आहे व मकर संक्रांतीच्या शुभेच्छा दिल्या. सौ. अय्यर यांनी आपले विचार मांडले. सौ. मोहिते मार्गदर्शन करताना बंब साहेबाच्या नेतृत्वात नुकतेच संपुर्ण मराठवाडाच्या दौऱ्यात महिला शाखा उघडण्यात आल्या आहे. धार्मिक, सामाजिक, शैक्षणिक, राजकीय, उद्योग - व्यवसाय सर्व क्षेत्रात महिला आघाडीवर आहे. महिलांना फक्त चुल-मुल पर्यंत न राहता उद्योग व्यवसायात पुढे यावे असे सौ. मोहिते म्हणाल्या. या कार्यक्रमासाठी श्रीमती प्रतिभा खाडे, सौ. सुवर्णा जोशी, सौ. अनुसया देवकाते, सौ. सुनिता पाटील, सौ. निर्मला कपाळे, सौ. सुनिता पालकर, सौ. पुनम शेळके, सौ. अंजनी लड्ढा, अदिती मोखळकर, कांचन पवार, कविता पवार, नुतन टापर, आदिनी परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे सुत्र संचालन व आभार सचिव संगीता पांगारकर यांनी केले. कार्यक्रमात मोठ्या संख्येने महिला उपस्थित होत्या.

# वाद विवाद स्पर्धेत वारजे माळवाडीतील कॉलेज अजिंक्य

शिर्डी

लोणी येथील पद्मश्री विखे पाटील महाविद्यालयात झालेल्या सहकारमहर्षी पद्मश्री डॉ. विठ्ठलराव विखे पाटील राज्यस्तरीय आंतरमहाविद्यालय रौप्य करंडक वादविवादचा यावर्षीच्या पद्मश्री विखे पाटील रौप्य करंडकावर पुणे येथील कला, वाणिज्य महाविद्यालय वारजे माळवाडी येथील विद्यार्थ्यांनी नाव कोरले. कनिष्ठ गटामध्ये पद्मश्री विखे पाटील कनिष्ठ महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी बाजी मारली. या स्पर्धेमध्ये राज्यभरातील ३४ महाविद्यालयांच्या संघांनी सहभाग घेतला.

यंदा संयोजन समितीने 'कृत्रिम बुद्धिमत्ता मानवी जीवनाच्या सर्वांगीण विकासास पूरक ठरेल' हा विषय वादविवादासाठी ठेवला होता. या प्रस्तावाच्या अनुकूल आणि प्रतिकूल बाजूने विद्यार्थ्यांनी अतिशय अभ्यासपूर्ण मते मांडली. ही स्पर्धा वरिष्ठ आणि कनिष्ठ अशा दोन गटात झाली. स्पर्धेचे पारितोषिक वितरण भेंडा येथील जिजामाता महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शिरीष लांडगे, सहसचिव भारत घोगरे, डॉ.भास्कर शेळके, डॉ. प्रदीप दिघे, शिक्षण संचालिका लीलावती सरोदे,उपप्राचार्य डॉ. आर. ए. पवार आदींच्या उपस्थितीत करण्यात आले. स्पर्धेचे परीक्षण डॉ. जितेंद्र पाटील, राजेंद्र जोरवर, साहित्यिक प्रा. शशिकांत शिंदे यांनी केले. या स्पर्धेमध्ये सांघिकमध्ये अनिकेत वनारे आणि नितीन गागरे कला आणि वाणिज्य महाविद्यालय वारजे माळवाडी पुणे यांनी करंडक मिळवला. वरिष्ठ गटामध्ये आरडीआयके महाविद्यालय बडनेरा येथील आदित्य डोळे यांनी प्रथम, वारजे माळवाडी पुणे येथील अनिकेत वनारे यांनी द्वितीय तर याच महाविद्यालयाचा नितीन गागरे यांनी तृतीय क्रमांक तर अळकुटी येथील महाविद्यालयातील मुस्कान शेख यांनी उत्तेजनार्थ पारितोषिक मिळविले. कनिष्ठ गटात प्रथम- पद्मश्री विखे पाटील कनिष्ठ महाविद्यालय, लोणी येथील अंकिता जगताप, प्रियंका सिनारे द्वितीय, अगस्ती विद्यालय अकोले येथील दर्शन चौधरी तृतीय तर उत्तेजनार्थ प्रवरा पब्लिक स्कूल येथील स्वरुप भोसले यांनी यश मिळविले. यावेळी भारत घोगरे, प्रा.जितेंद्र पाटील यांनी मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. आर. ए. पवार यांनी केले. सूत्रसंचालन डॉ. एस. एम. वाकोळे, प्रा. डी. के.खेमनर यांनी आभार डॉ. शांताराम चौधरी यांनी मानले.

# पंढरपूर येथे तुळशी पूजा व श्रीमद्भागवत सप्ताह

पंढरपूर । प्रतिनिधी

संपूर्ण महाराष्ट्राचे आराध्य दैवत असलेल्या तीर्थक्षेत्र पंढरपूर येथे पंढरपूर नारायण गड मठाच्या वतीने सात दिवसांचा भव्य दिव्य तुळशी पूजा व श्रीमद्भागवत सप्ताह कार्यक्रम मोठ्या भक्तिभावाने, शिस्तबद्ध नियोजनात आणि उत्साहाच्या वातावरणात पार पडला. या धार्मिक अनुष्ठानास नगद नारायण महाराज यांच्या कृपाशीर्वादाचे लाभ मिळाले असून ह.भ.प. प्रेममूर्ती शिवाजी महाराज, श्रीक्षेत्र नारायण गड यांच्या पावन आशीर्वादाने कार्यक्रम अधिकच मंगलमय ठरला. या संपूर्ण सप्ताहाचे कुशल नियोजन व मार्गदर्शन नारायण गडाचे उत्तराधिकारी ह.भ.प. संभाजी महाराज यांनी केले. त्यांच्या मार्गदर्शनाखाली हा कार्यक्रम केवळ धार्मिक सोहळा न राहता सामाजिक एकोप्याचे व भक्तीचे दर्शन घडवणारा ठरला.

सात दिवस चाललेल्या या श्रीमद्भागवत सप्ताहासाठी बीड, जालना, पुणे, अहिल्यानगर, सोलापूरसह राज्यातील विविध जिल्ह्यांतून हजारो भाविकांनी पंढरपूर नारायण गड मठ



येथे हजेरी लावली. भाविकांनी तुळशी पूजन, अभिषेक, आरती, भजन-कीर्तन तसेच कथा श्रवणाचा लाभ घेतला. या सप्ताहात विशेषतः महिलांचा मोठ्या प्रमाणावर सहभाग दिसून आला. हजारो महिला भगिनी भक्तिरसात तल्लीन झालेल्या पाहावयास मिळाल्या. श्रीमद्भागवताची संगीतमय कथा ह.भ.प. गुरुवर्य ज्योतिषाचार्य बबनदेव महाराज जोशी यांनी आपल्या सुमधुर, ओघवत्या वाणीने सादर केली. त्यांच्या कथाकथनातून भक्ती, वैराग्य, संस्कार आणि जीवनमूल्यांचा संदेश प्रभावीपणे भाविकांपर्यंत पोहोचला. कथेसाठी नागपूरचे कैलास लोखंडे तसेच अमरावतीचे रुपेश खोडे यांनी उत्कृष्ट व भक्तिरसपूर्ण साथसंगत केली. ह.भ.प. प्रेममूर्ती शिवाजी महाराज, श्रीक्षेत्र नारायण गड यांच्या आज्ञेनुसार ह.भ.प. खरात महाराज (आळंदी) यांच्या काल्याच्या कीर्तनाने या सात दिवसीय सप्ताहाची सांगता झाली. त्यांच्या प्रभावी कीर्तनाने उपस्थित भाविक मंत्रमुग्ध झाले. त्यानंतर महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले. या महोत्सवाच्या यशस्वी आयोजनासाठी शिरस मार्ग, काळेवाडी, टाकळगव्हाण, तरटेवाडी, शहाजनपूर, लोळदगाव तसेच बीड, जालना, पुणे, अहिल्यानगर आदी अनेक जिल्ह्यांतील भाविकांनी अन्नदान महापंगतीद्वारे मोलाचे सहकार्य केले. या सेवेमध्ये माननीय अमरसिंहजी पंडित (सरचिटणीस, राष्ट्रवादी काँग्रेस), माननीय सुरेश रावजी नवले (माजी ऊर्जामंत्री, बीड) यांच्यासह अनेक मान्यवर, दानशूर व्यक्ती व भाविक सहभागी झाले होते. या सात दिवसांच्या धार्मिक कार्यक्रमामुळे पंढरपूर परिसर भक्तिरसाने भारावून गेला असून, सामाजिक एकता, भक्तीभाव व सेवा परंपरेचे सुंदर दर्शन या सप्ताहातून घडल्याची भावना भाविकांनी व्यक्त केली.

# बहुजन समाजाने एआयच्या उपयोगासाठी सक्षम बनावे : बाबासाहेब मोरे

बीड

पे बॅक टू सोसायटी प्रोग्राम, बीड यांच्या वतीने राजमाता जिजाऊ, सावित्रीमाई फुले, फातिमा शेख व मुक्ता साळवे यांच्या संयुक्त जयंतीनिमित्त धानोरा रोड, बीड येथे प्रबोधनात्मक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ज्येष्ठ विचारवंत प्रा. वसंत ओगले होते. प्रमुख वक्त्या म्हणून प्रा. छाया सोंडगे यांनी आपले विचार मांडले. तसेच पे बॅक टू सोसायटीचे बाबासाहेब मोरे यांनी मार्गदर्शन केले.

यावेळी बाबासाहेब मोरे यांनी प्रतिपादन केले की, २१ व्या शतकात बहुजन समाजाने आर्टिफिशियल इंटेलिजन्स (एआय) तंत्रज्ञानाचा वैयक्तिक व सामाजिक उन्नतीसाठी उपयोग करण्याचे शिकावे व इतरांनाही ते शिकवावे. एआय हे केवळ तांत्रिक क्षेत्रापुरते मर्यादित न राहता शिक्षण, व्यवसाय, पत्रकारिता व सामाजिक चळवळींसाठी प्रभावी साधन



ठरू शकते, असे त्यांनी स्पष्ट केले. कार्यक्रमात नवनिर्वाचित नगरसेवक सीता मोरे व भैय्यासाहेब मोरे या दांपत्याचा सत्कार करण्यात आला. यावेळी महानायिकांच्या जीवनकार्यावर वीस विद्यार्थ्यांनी आपले विचार व्यक्त केले. या कार्यक्रमास महिला व पुरुषांची मोठ्या प्रमाणावर उपस्थिती होती. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभारप्रदर्शन कुमारी शिवानी दळवी यांनी केले.

# महिलांच्या हाती आता केवळ पाळण्याची नाही, तर समाजाची दोरी -न्यायमूर्ती किशोर संत

## पाटोदा येथे विधी सेवा प्राधिकरणाच्या मेगा लीगल कॅम्पला उस्फूर्त प्रतिसाद; शासनाच्या विविध योजनांचे लाभार्थ्यांना वितरण

पाटोदा । प्रतिनिधी

अन्यायाची जाणीव होणे ही मूलभूत गरज आहे आणि हक्कांची जाणीव होणे हा प्रत्येक नागरिकाचा मूलभूत अधिकार आहे. भारत हा लोकशाहीप्रधान देश असून, राज्यघटना हा लोकशाहीचा कणा आहे आणि 'सर्वांना न्याय' हेच तिचे अंतिम उद्दिष्ट आहे. अशा महाशिबिरांमधून प्रशासन, पोलीस यंत्रणा आणि न्यायव्यवस्था यांच्यात योग्य समन्वय साधला जातो, ही अत्यंत आनंदाची बाब आहे. बदलत्या काळात महिलांच्या हाती आता केवळ पाळण्याची दोरी नाही, तर संपूर्ण समाजाची जबाबदारी आहे, असे स्पष्ट व परखड मत मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाचे न्यायमूर्ती किशोर संत यांनी व्यक्त केले.

महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण, मुंबई यांच्या संकल्पनेतून जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, बीड, जिल्हाधिकारी कार्यालय, बीड तसेच तालुका विधी सेवा समिती, पाटोदा यांच्या संयुक्त विद्यमाने रविवारी पाटोदा येथे मेगा लीगल कॅम्प (महाशिबिर) आयोजित करण्यात आला. या शिबिराला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

या कार्यक्रमास न्यायमूर्ती किशोर संत यांच्यासह जिल्हा व सत्र न्यायाधीश आनंद यावलकर, जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे सचिव सय्यद वहाब, बीड जिल्ह्याचे पोलीस अधीक्षक नवनीत कावत, अपर जिल्हाधिकारी धार्मिक, पाटोदा न्यायालयाचे न्यायाधीश एम. ए. शिंदे, पाटोदा वकील संघाचे अध्यक्ष अ‍ॅड. बी. आर. लवूळ यांची प्रमुख उपस्थिती होती.



न्यायमूर्ती किशोर संत पुढे म्हणाले की, समाजामध्ये कायद्याविषयीची जाणीव आणि माहिती अत्यंत आवश्यक आहे. वाद सामोपचाराने मिटल्यास समाज अधिक सुसंस्कृत आणि सुदृढ बनतो. विधी सेवा प्राधिकरणाच्या माध्यमातून गरजूंना योग्य न्याय मिळू शकतो. आर्थिक न्याय हे संविधानाचे एक महत्त्वाचे उद्दिष्ट असून, शासनाच्या विविध योजनांमधून आर्थिक सबलीकरण शक्य आहे. मात्र अनेकदा योजनांची माहिती सर्वसामान्यांपर्यंत पोहोचत नाही. अशा शिबिरांमधून ही दरी भरून काढता येते आणि मोठे सामाजिक उद्दिष्ट साध्य होते. महिला बचत गटांच्या माध्यमातून महिलांना न्याय, आत्मसन्मान आणि आर्थिक उन्नती मिळू शकते. 'मी स्वावलंबी झाले' ही भावना महिलांच्या चेहऱ्यावर दिसणे हेच खरे यश आहे. कायद्याविषयी जागरूकता वाढली, तर अन्याय आपोआप कमी होतो. जो समाज कायद्याने चालतो, तो समाज निश्चितच प्रगती करतो, असेही त्यांनी ठामपणे नमूद केले.

यापूर्वी बोलताना जिल्हा व सत्र न्यायाधीश आनंद यावलकर यांनी सांगितले की, गरजू नागरिकांना कायदेविषयक सेवा सुलभपणे उपलब्ध व्हाव्यात, यासाठी अशा प्रकारच्या शिबिरांचे आयोजन करण्यात येते. महाआदालतींमधून सामोपचाराने प्रकरणे मिटल्यास न्यायालयीन शुल्काची परतफेडही केली जाते. मनोधैर्य योजना यांसारख्या योजनांमधून अत्याचारग्रस्त महिलांना आर्थिक मदत व आधार दिला जातो. तसेच हिट अँड रन प्रकरणांमध्ये मृत व्यक्तीच्या वारसांना विधी सेवा प्राधिकरणाच्या माध्यमातून दोन लाख रुपयांची मदत दिली जाते, अशी माहितीही त्यांनी दिली. बीड जिल्ह्याचे पोलीस अधीक्षक नवनीत कावत यांनी आपल्या भाषणात सांगितले की, मागील काही कालावधीत बीड जिल्ह्यात पोलीस दल अधिक आधुनिक करण्यावर भर देण्यात आला आहे. नागरिकांचे हित डोळ्यासमोर ठेवून पोलीस प्रशासन काम करत आहे. कोणताही गुन्हा घडत असल्यास तो सहन न करता तात्काळ पोलिसांना कळवावा. बीड पोलीस सदैव नागरिकांच्या सेवेत तत्पर आहेत. कायद्याच्या दृष्टीने बीड जिल्ह्याला प्रगत बनवण्यासाठी सर्वांनी एकत्रित प्रयत्न करावेत, असे आवाहन त्यांनी केले.

जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी जतीन रहमान यांनी सांगितले की, प्रशासन, पोलीस आणि न्यायव्यवस्था या तीनही यंत्रणा अशा महाशिबिरांमधून एकत्र येतात. बीड जिल्ह्यात आतापर्यंत ५० हजार घरकुले पूर्ण झाली असून, उर्वरित काम चार महिन्यांत पूर्णत्वास जाणार आहे. दोन लाख घरकुले मंजूर असून, सुमारे ◀◀ पान ३ वर

# अनादरीत धनादेशा प्रकरणी आरोपीस सात लाख रुपये दंड व सहा महिने शिक्षा-अ‍ॅड. शशिकांत सावंत

बीड । प्रतिनिधी

येथील अतिरिक्त मुख्य न्यायदंडाधिकारी साहेब ९ वे यांनी महत्त्वपूर्ण निकाल देऊन आरोपीस तब्बल सात लाख रुपयाचा दंड करून सहा महिन्याची शिक्षा सुनावलेली आहे, घटनेची हकीकत अशी की, आरोपी अशोक निवृत्ती जाधव,यांनी फिर्यादी अरुण दादाराव सोनवणे,यांच्याकडून रक्कम रुपये सहा लाख रुपये हात उसने म्हणून घेतले होते सदरची रक्कम परत करतेवेळी आरोपी यांनी फिर्यादी यांच्या हक्कांमध्ये रक्कम रुपये सहा लाख रुपयाचा धनादेश दिला होता सदरचा धनादेश बँकेत वाटेल व फिर्यादीस त्याची आरोपीकडे असणारी रक्कम त्यास मिळून जाईल असा शब्द व भरवसा दिला होता,



परंतु सदरचा धनादेश बँकेत अनादरीत झाला व खात्यावर पुरेशी रक्कम शिल्लक नाही या कारणाने परत आला त्यामुळे फिर्यादी,यांनी आरोपी यांच्या विरोधामध्ये बीड येथील अतिरिक्त मुख्य न्याय दंडाधिकारी साहेब बीड यांचे न्यायालयात समरी क्रिमिनल केस क्रमांक. ६३८/२३ अरुण विरुद्ध अशोक असे प्रकरण दाखल केले सदर प्रकरणांमध्ये मा. न्यायालयाने गुणदोषावर प्रकरण चालून आरोपीच्या वतीने सावकारकीचा बचाव घेण्यात आला व त्याने फिर्यादी कडून व्याजाने पैसे घेतले होते व त्याने दिलेला सुरक्षा पोटीचा धनादेशाचा गैरवापर केल्याचा बचाव घेण्यात आला परंतु मा. न्यायालयाने आरोपीचा बचाव फेटाळून लावला व प्रकरणांमध्ये आरोपीने कलम १३८ निगोशिएबल इन्स्ट्रुमेंट क्ट प्रमाणे गुन्हा केल्याचे निष्पन्न झाल्यामुळे महत्त्वपूर्ण निकाल देऊन आरोपी अशोक निवृत्ती जाधव , यांना सात लाख रुपये दंड व सहा महिन्याची शिक्षा सुनावलेली आहे सदर प्रकरणात फिर्यादीच्या वतीने अ‍ॅड. शशिकांत सावंत यांनी भक्कम बाजू मांडली, त्यांना अ‍ॅड. विशाल विलासराव कदम,अ‍ॅड. अभिषेक बहिर,अ‍ॅड. माऊली डाके अ‍ॅड. राजकुमार धरणे,अ‍ॅड. मुकुंद लोणकर अ‍ॅड. प्रदीप दराडे अ‍ॅड. विजय डोके,अ‍ॅड. अमोल तिडके,अ‍ॅड. प्रतीक गव्हाणे यांनी सहकार्य केले.

# इकरा पब्लिक स्कूलमध्ये 'कॅन्टीन डे' उपक्रम उत्साहात साजरा

## न.प. नवनिर्वाचित अध्यक्षा मेहरीन शिफा बिलाल सहीत नगरसेवकांचा सत्कार

**मजलगाव । प्रतिनिधी**

दिनांक १६ जानेवारी २०२५ रोजी इक़रा पब्लिक स्कूल, मजलगाव यांच्या वतीने विद्यार्थ्यांमध्ये उद्योजकता, आत्मविश्वास व व्यवहारज्ञान वाढविण्याच्या उद्देशाने कॅन्टीन डे उपक्रमाचे आयोजन शादीखाना, जुना बाजार रोड, मजलगाव येथे करण्यात आले. या उपक्रमाचे उद्घाटन मजलगावच्या माननीय नगराध्यक्षा सौ. चाउस मेहरीन शिफा बिलाल यांच्या हस्ते झाले.

कार्यक्रमास मा. बिलाल सहाल चाउस, नगरसेवक श्री. मुझम्मिल पटेल, नगरसेवक श्री. सय्यद सज्जाद व नगरसेवक श्री. जुनेद खान यांची प्रमुख उपस्थिती होती. या ठिकाणी




संस्थेच्या वतीने न. प. चे नवनिर्वाचित अध्यक्षा मेहरीन शिफा बिलाल व उपस्थित नगरसेवकांचे सत्कार करण्यात आले. मान्यवरांनी आपल्या भाषणातून या उपक्रमाचे कौतुक करत शाळेस सर्वोपरी मदत कण्याचे आश्वासन देत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन व प्रेरणा दिली.

विद्यार्थ्यांनी स्वतः तयार केलेल्या विविध खाद्यपदार्थांचे स्टॉल उभारले होते. मास्टरशेप कॅप परिधान करून विद्यार्थ्यांनी उत्साहात व आनंदात खाद्यपदार्थांची विक्री केली. या उपक्रमात पालकांनीही मोठ्या संख्येने सहभाग घेत आपल्या पाल्यांना प्रोत्साहन दिले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शाळेच्या शिक्षकवर्गाने विशेष परिश्रम घेतले. यामध्ये शेख परवीन मॅडम, मोमिन नोमान सर, सादिया मिस, सुहाना मिस, अदिबा मिस, फैजा मिस तसेच शाळेच्या सेविका अंजुम तांबोळी यांचे मोलाचे योगदान लाभले. या कॅन्टीन डे उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास, संघभावना व व्यावसायिक दृष्टिकोन विकसित झाल्याचे दिसून आले. या उपक्रमाच्या यशस्वीतेसाठी शाळेचे अध्यक्ष अब्दुल गनी सर, मुख्याध्यापक शेख तौसिफ सर, अ‍ॅड. खलिल साहेब, ३च् कार केअरचे मालक शेख अतिक, मस्के मेडिकलचे मालक शेख तौफिक तसेच त्यांच्या मित्रपरिवाराने विशेष सहकार्य केले.

# युसूफवडगांव येथे शासकिय हमी भाव तुर खरेदी केंद्राची सुरूवात

**युसूफवडगांव । प्रतिनिधी**

**केज तालुक्यातील युसूफवडगांव येथे आत्मनिर्भर भारत अभियान अंतर्गत व नाफेडच्या वतीने एसएसके अँग्रो फार्मर पोड्युसर लि.युसूफवडगांव येथे शासकीय तुर हमीभाव खरेदी केंद्र चालु करण्यात आले असुन तालुक्यातील व परिसरातील शेतकरी बांधवांनी तुर विक्रीसाठी नाव नोंदणी करून घ्यावी.**

सध्या शासनाने तुरीला ठरवुन दिलेल्या हमीभावापेक्षा कमी दराने तुर खरेदी चालु होती कारण तालुक्यातील शेतकऱ्यांना शासनाने ठरवुन दिलेल्या हमीभावने तुरीची विक्री करायची असेल तर त्यासाठी शासकीय हमीभाव खरेदी केंद्र लागते आणि केज तालुक्यासाठी फक्त एकच शासकीय खरेदी केंद्र असल्याने शेतकऱ्यांना विविध अडचणीचा सामान करावा लागतो आहे.त्यामुळे युसूफवडगांव येथील एसएसके अँग्रोचे चेअरमन शिवराज खरबड यांनी आपल्या प्रयत्नांची पराकाष्ठा करून तालुक्यातील व परिसरातील शेतकऱ्यांच्या सोयी साठी आत्मनिर्भर भारत अभियान अंतर्गत व नाफेडच्या वतीने युसूफवडगांव येथे शासकिय तुर हमीभाव खरेदी केंद्र चालु केले असुन जास्तीत जास्त शेतकऱ्यांनी याचा लाभ घेण्याचं आवाहन केल आहे. तरी शेतकऱ्यांनी नाव नोंदणी करण्यासाठी आधार कार्ड झेरॉक्स,७/१२,बँक पासबुक झेरॉक्स,पिक पेरणी व पीक तपक्षील घेऊन यावी तरी सर्व शेतकऱ्यांना शासकिय हमीभाव मिळण्यासाठी व आपले आर्थिक नुकसान टाळण्यासाठी शासकीय हमीभाव खरेदी केंद्रावरच तुर विक्री करावी असे आवाहन एसएसके अँग्रोचे चेअरमन शिवराज खरबड यांनी केले आहे.

# बालविवाह रोखण्यासाठी रासेयोने जनजागृती करावी -सुनील सरवदे

गेवराई । प्रतिनिधी

महाविद्यालयाचा 'राष्ट्रीय सेवा योजना' विभाग हा प्रबोधनपर कार्यक्रमासाठी नेहमीच अग्रेसर असतो. या रासेयो च्या विशेष युवती शिबिरामध्ये स्वंयसेविकांनी बालविवाह रोखण्यासाठी जनजागृती करावी. असे प्रतिपादन श्री. सुनील सरवदे यांनी केले. ते 'राष्ट्रीय सेवा योजना' विशेष शिबिराच्या बौद्धिक सत्रामध्ये मार्गदर्शक म्हणून बोलत होते. यावेळी अध्यक्षस्थानी प्रा. डॉ. शिवाजी दिवाण हे होते.

जय भवानी शिक्षण प्रसारक मंडळाचे महिला महाविद्यालय, गेवराई च्या 'राष्ट्रीय सेवा योजना' विभागाच्या विशेष शिबिरात 'बालविवाह रोखण्यासाठीचे उपाय' या विषयावर श्री. सुनील सरवदे यांनी मार्गदर्शन केले. यावेळी बोलताना ते म्हणाले की, कमी वयामध्ये विवाह झाल्यामुळे आरोग्यविषयक व सामाजिक समस्या निर्माण होतात. तिला कर्तृत्व सिद्ध करण्याची संधी मिळत नाही. पर्यायाने समाज व देशाचे नुकसान होते. यासाठी 'राष्ट्रीय सेवा योजना' च्या माध्यमातून बालविवाह प्रतिबंधक कायदे, शासनाच्या योजना, पालकांची जबाबदारी याविषयी जनजागृती करावी. असे आवाहन त्यांनी केले. अध्यक्षीय भाषणात प्रा. डॉ. शिवाजी दिवाण यांनी 'राष्ट्रीय सेवा योजना' ही समाज ◀◀ पान ३ वर

# निराधार योजनेत मोठा घोटाळा?

## सामाजिक कार्यकर्ते सलीम बापू यांचा अमरण उपोषणाचा इशारा

माजलगाव । प्रतिनिधी

येथील तहसील कार्यालयात निराधार योजनेच्या नावाखाली सुरू असलेला कथित भ्रष्टाचार तात्काळ थांबवावा, अन्यथा थेट अमरण उपोषणाचा मार्ग स्वीकारला जाईल, असा गंभीर इशारा आंबेडकरी विचार मंच व आंबेडकरी रिपब्लिकन मोर्चाचे मराठवाडा अध्यक्ष तसेच ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते सलीम बापू यांनी येत्या २० जानेवारीला आमरण उपोषणा चा इशारा सलीम बापू यांनी प्रशासनाला दिला आहे.



माजलगाव तहसील कार्यालयातील निराधार विभागातील काही कर्मचारी व दलाल यांच्या संगनमताने नियमबाह्य पद्धतीने लाभार्थींची नावे मंजूर करण्यात येत असल्याचा आरोप त्यांनी केला आहे. मूळ संचिका उपलब्ध नसतानाही हयातनामे मंजूर कशाच्या आधारे केली जात आहेत? असा थेट सवाल त्यांनी उपस्थित केला आहे.

सन २०२० ते २०२५ या कालावधीत किती बैठका घेण्यात आल्या, किती ठराव मंजूर झाले आणि किती नवीन लाभार्थी यादीत समाविष्ट करण्यात आले, याची सविस्तर माहिती जाहीर करावी, अशी मागणीही करण्यात आली आहे.

यासोबतच मयत लाभार्थ्यांच्या नावावर अजूनही एटीएमद्वारे अनुदान उचलले जात असल्याचा धक्कादायक प्रकार समोर येत असून, अशा प्रकरणांमध्ये केवायसी प्रक्रिया करून ◀◀ पान ३ वर

# उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत संगीता ठोंबरे यांचा शिवसेनेत प्रवेश



## केजमध्ये शिवसेनेच्या ताकदीला मिळाले बळ : सचिन मुळूक

बीड । प्रतिनिधी

शिवसेनेचे मुख्य नेते तथा उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखाली राज्यात वेगाने संघटन विस्तार करत असलेल्या शिवसेनेला केज विधानसभा मतदारसंघात मोठे राजकीय बळ मिळाले आहे. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाट यांच्या प्रमुख उपस्थितीत केजच्या माजी आमदार तथा राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाच्या प्रदेश उपाध्यक्ष संगीताताई ठोंबरे व लोकनेते गोपीनाथराव मुंडे सहकारी सूतगिरणी, केजचे व्हा. चेअरमन डॉ. विजयप्रकाश ठोंबरे यांनी शिवसेनेत जाहीर प्रवेश केला.

या वेळी शिवसेना जिल्हाप्रमुख सचिन मुळूक, जिल्हाप्रमुख अनिल जगताप, चंद्रकांत नवले, तालुकाप्रमुख परळी व्यंकटेश शिंदे उपस्थित होते

माजी आमदार संगीता ताई ठोंबरे यांच्या सोबत सोबत विजय बापू केंद्रे (संस्थापक अध्यक्ष, संत भगवान बाबा युवा सेना), किशोरजी थोरात (मा. सरपंच, कुंबेफळ), अरविंद चाळक, अशोक सक्राते (मा. सरपंच, येवता) व ◀◀ पान ३ वर

# महिला क्रिकेट सामन्यात गो.कुं.यो.कन्या विद्यालयाचा विजय

## शितल जगतापचे विक्रमी अर्धशतक, प्लेयर ऑफ द मॅचचा किताब

अंबाजोगाई । प्रतिनिधी

श्रीमती गो.कु.यो. कन्या विद्यालयाच्या महिला क्रिकेट संघाने दे.बा. गणगे यो.प्रा. विद्यालयाच्या महिला संघाला पराभूत करून शानदार विजय प्राप्त केला. तडाखेबाज फलंदाज शितल जगताप यांची ०९ चौकारासह अर्धशतकी खेळी संघांच्या विजयासाठी मोलाची ठरली.



प्राथमिक विद्यालयाच्या महिला संघाला शंभर धावांवर रोखल्यानंतर गो.कु.यो.कन्या विद्यालयाच्या महिला संघाने विजयी लक्ष्य नऊ षटकांत गाठले. शितल जगताप (५०) व किर्ती पुजारी (२३) या सलामी जोडीने भरघोस धावा घेतल्या. कर्णधार शुभांगी क्षीरसागर १३ धावा अनिता लोंढे सहा धावा तर विद्या घायाळ नाबाद एक या प्रमाणे फलंदाजी केली. कर्णधार शुभांगी ◀◀ पान ३ वर

# आ.धस यांचे खंदे समर्थक मनोज धनवडे - मुर्शदपुर पं.स.गणाचे प्रबळ दावेदार

आष्टी । प्रतिनिधी

मुर्शदपुर (ता. आष्टी) येथील सामाजिक-राजकीय क्षेत्रात सातत्याने सक्रिय असणारे, सामान्य जनतेशी थेट नाते जपणारे आणि विकासाला प्राधान्य देणारे नेतृत्व म्हणून मनोज धनवडे यांचे नाव आदराने घेतले जाते.

सन २०१५ साली कासारी-मुर्शदपुर ग्रामपंचायतीचे सरपंच म्हणून त्यांनी जबाबदारी स्वीकारली आणि आपल्या कार्यकाळात विकासाची ठोस छाप गावावर उमटवली. रस्ते, पाणीपुरवठा, स्वच्छता, सार्वजनिक सुविधा, सामाजिक सलोखा आणि शासकीय योजनांचा प्रभावी लाभ - या सर्व बाबींमध्ये त्यांनी लोकाभिमुख कामकाजाचा आदर्श निर्माण केला. आमदार सुरेश आण्णा धस यांचे विश्वासू सहकारी लोकनेते मराठवाडा भूषण आमदार सुरेश



आण्णा धस यांचे मनोज धनवडे हे खंदे समर्थक असून, त्यांच्या नेतृत्वावर त्यांचा ठाम विश्वास आहे. पक्ष संघटन मजबूत करणे, कार्यकर्त्यांना बळ देणे आणि तळागाळातील प्रश्न थेट नेतृत्वापर्यंत पोहोचवणे यामध्ये त्यांनी महत्त्वाची भूमिका बजावली आहे.

सरपंचपदाच्या कार्यकाळात विकासाची दिशा

सरपंच असताना मनोज धनवडे यांनी - गावांतर्गत सिमेंट रस्त्यांची कामे पाणीपुरवठा सुधारणा घरकुल व विविध लाभार्थी योजनांचा लाभ स्वच्छ भारत अभियानाची प्रभावी अंमलबजावणी

सामाजिक कार्यक्रमांना चालना अशा अनेक उपक्रमांमुळे ग्रामस्थांचा विश्वास संपादन केला. पंचायत समिती गणासाठी प्रबळ दावेदार आज मुर्शदपुर पंचायत समिती गणासाठी ते प्रबळ दावेदार म्हणून ओळखले जात आहेत. ग्रामीण भागातील समस्या, शेतकरी प्रश्न, युवकांचे रोजगार, महिला सक्षमीकरण आणि शिक्षण-आरोग्य सुविधा या विषयांवर त्यांची ठाम भूमिका आहे.राजकारण म्हणजे सत्तेसाठी नव्हे तर सेवेसाठी हा मंत्र जपत त्यांनी नेहमीच लोकहिताला प्राधान्य दिले आहे. त्यामुळेच गावागावातील नागरिक, युवक वर्ग आणि ज्येष्ठ मंडळींमध्ये त्यांना मोठा पाठिंबा मिळताना दिसतो. अनुभव, कार्यक्षमता आणि जनविश्वासाचे बळ अनुभवसंपन्न नेतृत्व, प्रशासनाची जाण, कार्यकर्त्यांचा मजबूत पाठिंबा आणि जनतेशी असलेले आत्मीय नाते - या बळावर मनोज धनवडे हे पंचायत समिती निवडणुकीत प्रभावी उमेदवार ठरत आहेत.येणाऱ्या काळात मुर्शदपुर गणाच्या सर्वांगीण विकासासाठी ते सक्षम नेतृत्व देतील, असा विश्वास जनतेमध्ये व्यक्त होत आहे.तर आष्टी जिल्हा परिषद गटाचे सदस्य स्व रेडेकर गुरुजी यांचे ते नातु आहेत राजकीय पार्श्वभूमी असलेला का कार्यकर्ता आहे

# सडक सुरक्षा अभियान अंतर्गत सैनिकी विद्यालयात कार्यशाळा संपन्न

बीड । प्रतिनिधी

सैनिकी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात सडक सुरक्षा अभियान अंतर्गत कार्यशाळा आयोजण करण्यात आले. या अभियानाची सुरुवात विद्यालयात वृक्षारोपण करून करण्यात आली , अशी माहिती प्राचार्य श्री सचिन पवार सर यांनी दिली.

सैनिकी विद्यालयाचे प्राचार्य सचिन पवार सर यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या कार्यक्रमात प्रमुख पाहुणे संदीप जाधव ( वरिष्ठ सुरक्षा मॅनेजर), मनीष राय ( प्रोजेक्ट मॅनेजर),




मनवींदर पांडे ( प्रोजेक्ट मॅनेजर), सोनू पांडे (सुरक्षा मॅनेजर), सैनिकी विद्यालयाचे सेना पदक विजेते श्री मेघराज कोल्हे सर , मदन गायकवाड , प्रकाश दफादर व रितेश राठोड यांच्या उपस्थितीत सडक सुरक्षा व दुर्घटने पासून बचाव होण्यासाठी मार्गदर्शनपर कार्यशाळा सैनिकी विद्यालयात संपन्न झाली. या कार्यक्रमाच्या वेळी विद्यालयात वृक्षारोपण , खो-खो स्पर्धा व चित्रकला स्पर्धा घेण्यात आल्या. या स्पर्धेत टोनपे यश, लोणकर अविनाश, खटके निलेश या विजेत्या विद्यार्थ्यांना बक्षिसे देण्यात आली. या कार्यक्रमाचे सूत्रसंचलन बिभिशन किलमीसे सर यांनी केले तर प्रमुख मार्गदर्शक संदीप जाधव यांनी सडक सुरक्षा याचे महत्त्व सांगताना रस्त्यावर होणारे अपघात टाळण्यासाठी कशा पद्धतीने टू व्हीलर, फोर व्हीलर वाहने चालवावीत, ◀◀ पान ३ वर

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Subhash vilasrao choure. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायलयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

# बनावट दस्तऐवजांचा मोठा कट उघड; भूमी अभिलेख कार्यालयातील ३ कर्मचाऱ्यांसह दहा जणांवर गुन्हा

**शिरूर । प्रतिनिधी**

शिरूर तालुक्यातील पारोडी येथील वडिलोपार्जित शेतजमीन बळकावण्यासाठी तब्बल सहा दशकांपूर्वीच्या एकत्रिकरण नोंदींमध्ये छेडछाड करून बनावट जबाब, खोट्या सह्या व शिक्के तयार केल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. या प्रकरणी शिरूर पोलीस ठाण्यात विविध कलमा अंतर्गत गंभीर स्वरूपाचा गुन्हा दाखल करण्यात आला असून, यात एकूण १३ जण आरोपी आहेत.




विशेष म्हणजे या कथित कटात येळे कुटुंबातील सदस्यांसह उपअधिक्षक भूमी अभिलेख कार्यालय, शिरूर येथील कर्मचाऱ्यांचाही सहभाग असल्याचा आरोप असल्याने प्रशासनात मोठी खळबळ उडाली आहे. या प्रकरणातील फिर्यादी पोपट गंगाराम येळे (वय ४८, रा. पारोडी, ता. शिरूर) यांनी दिलेल्या तक्रारीनुसार, शिवतक्रार म्हाळुंगी येथील गट नं. १६ ही जमीन त्यांच्या आजोबा कृष्णा ऊर्फ किसन तात्या येळे यांच्या नावावर सन १९५७ च्या वाटपानुसार व १९६४-६५मधील एकत्रिकरण योजनेनुसार वैधरीत्या नोंदलेली होती. संबंधित जमिनीवर १९६६ ६७पासून सातत्याने ७ / १२ उताऱ्यावर फिर्यादी कुटुंबाचे नाव नोंदलेले होते. बँक कर्ज, वारस फेरफार व इतर अधिकृत नोंदींमधूनही हा हक्क निर्विवाद असल्याचे नमूद करण्यात आले आहे.

मात्र, आरोपींनी संगनमत करून गट नं. १६ बाबत दि. १०जानेवारी १९६७ रोजीचा तथाकथित जबाब बनावटरीत्या तयार केल्याचा आरोप आहे. या खोट्या जबाबावर मयत कृष्णा तात्या येळे यांचा खोटा अंगठा उमटवण्यात आला असून पंच म्हणून दगडू बाबुराव पाटील यांची बनावट सही, तसेच सहाय्यक एकत्रिकरण अधिकारी ( ८३, पुणे) यांची खोटी सही व शिक्के लावण्यात आल्याचा गंभीर आरोप फिर्यादीने केला आहे. हा बनावट दस्तऐवज नंतर जिल्हा न्यायालय पुणे येथील अपिल क्र. ३३९/ २०२२ मध्ये खरा पुरावा म्हणून सादर करण्यात आल्याचेही तक्रारीत नमूद आहे. या प्रकरणातील आरोपींची नावे पुढीलप्रमाणे आहेत

सोपान विष्णू येळे (वय ७८), २) निवृत्ती विष्णू येळे (६७), ३) चिंतामण विष्णू येळे (६५), ४) सुदाम विष्णू येळे (६०), ५) पांडुरंग विष्णू येळे (५७), ६) अमोल चिंतामण येळे (४५), ७) दिलीप निवृत्ती येळे (४८), ८) अविनाश ऊर्फ बापू चिंतामण येळे (३८), ९) प्रविण निवृत्ती येळे (३७), १०) विशाल ऊर्फ बाबू पांडुरंग येळे (२९), सर्व रा. येळेवस्ती, पारोडी, ता. शिरूर. तसेच ११) श्रीमती बेबीनंदा जयचंद्र शिंदे (शिपाई), १२) विनोद व्यंकटेश सूर्यवंशी (अभिलेखपाल) आणि १३) संतोष नामदेव काळाणे (परिरक्षण भूमापन) हे तिघेही उपअधिक्षक भूमी अभिलेख कार्यालय, शिरूर येथे कार्यरत कर्मचारी आहेत. फिर्यादींच्या म्हणण्यानुसार, भूमी अभिलेख कार्यालयातील मूळ एकत्रिकरण कागदपत्रे, खाते उतारे व जबाब पुस्तिकेतील पाने आरोपींनी संगनमताने नष्ट केली. या संदर्भात माहिती मागविल्यानंतर कार्यालयाने दि. ३१ जुलै २०२३ रोजी संबंधित जबाब अभिलेखात उपलब्ध नसल्याचे लेखी उत्तर दिले आहे. त्यामुळे बनावट कागदपत्रांचा संशय अधिक बळावला आहे. या प्रकरणाची दखल घेत घोडनदी येथील ज्युडिशियल मजिस्ट्रेट (वर्ग- ०१) यांनी फौजदारी प्रक्रिया संहिता कलम १५६(३) अन्वये गुन्हा दाखल करण्याचे आदेश दिले होते. त्यानुसार शिरूर पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदवण्यात आला आहे. तपास पोलीस उपनिरीक्षक भागवत करीत असून, प्रभारी अधिकारी म्हणून पोलीस निरीक्षक संदेश केंजळे हे मार्गदर्शन करीत आहेत. जमीन व्यवहारांमध्ये शिरूर भूमी अभिलेख कार्यालयातील अधिकाऱ्यांचे संगनमत, बनावट दस्तऐवज आणि न्यायालयीन प्रक्रियेचा गैरवापर केल्याचा हा अत्यंत गंभीर प्रकार असून, या प्रकरणातील तपासातून आणखी धक्कादायक बाबी समोर येण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. शिरूर भूमी अभिलेख कार्यालयातील अजून काही दस्ताऐवजांमध्ये काही फेरफार केला असल्याची दाट शक्यता नागरीकांकडून व्यक्त केली जात आहे.

## पुण्यात सासरच्या छळाला कंटाळून विवाहितेची आत्महत्या; पतीसह तिघांना अटक

**पुणे । प्रतिनिधी**

महिलेने सासरकडील छळामुळे आत्महत्या केल्याची घटना धनकवडीतील आंबेगाव पठार भागात घडली. महिलेला आत्महत्येस प्रवृत्त केल्याच्या आरोपावरुन पती, सासू, सासरे, तसेच नणंदेला अटक करण्यात आली.या प्रकरणी पती, सागर चंद्रकांत शेडगे, सासू कमल, सासरे चंद्रकांत, (तिघे रा. स्वामीकृपा बिल्डिंग, आंबेगाव पठार, धनकवडी) तसेच नणंद सारिका हर्षल वाल्हेकर (वय ३३, रा. आंबेगाव बुद्रुक, कात्रज) यांना अटक करण्यात आली. याबाबत महिलेच्या भावाने भारती विद्यापीठ पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, तक्रारदाराच्या बहिणीचा आरोपी सागर शेडगे याच्याशी पाच वर्षांपूर्वी विवाह झाला होता. विवाहानंतर महिलेचा छळ सुरू करण्यात आला. विवाहात मानपान केला नाही, तसेच हुंड्यात वस्तू दिल्या नाहीत, असे टोमणे मारण्यात आले. पतीने महिलेच्या चारित्र्याचा संशय घेऊन तिचा छळ केला. छळामुळे बहिणीने १७ जानेवारी रोजी राहत्या घरात आत्महत्या केली. पोलीस उपनिरीक्षक प्रियांका निकम तपास करत आहेत.

## कवठे येमाईत चोरट्यांचा धुमाकूळ; घरासमोर उभी केलेली 'पिकअप' रातोरात केली गायब

**शिरूर । प्रतिनिधी**

कवठे येमाई (ता. शिरूर) येथे घरासमोर मोकळ्या जागेत उभी केलेली पिकअप गाडी चोरून नेल्याची घटना घडली आहे. याप्रकरणी सोमनाथ नथू जाधव (वय २४, रा. कवठे यमाई) यांच्या फिर्यादीवरून शिरूर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे. घरासमोरून वाहन चोरीला गेल्याने परिसरात वाहनधारकांमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे.




फिर्यादी सोमनाथ जाधव यांचा ट्रान्सपोर्टचा व्यवसाय असून, त्यांनी आपली पिकअप गाडी (चक-१४-क्क्ष-४४१५) १५ जानेवारी रोजी रात्री दहाच्या सुमारास घरासमोरील पार्किंगमध्ये उभी केली होती. दुसऱ्या दिवशी १६ जानेवारी रोजी सकाळी ७ वाजता पाहिले असता, उभी केलेली गाडी गायब असल्याचे त्यांच्या निदर्शनास आले.चोरीस गेलेल्या या पिकअप गाडीची किंमत अंदाजे ५ लाख रुपये असून, इंजिन व चेसिस क्रमांकासह सविस्तर माहिती पोलिसांना देण्यात आली आहे. एकूण ५ लाख ६० हजार रुपयांचे नुकसान झाल्याचे फिर्यादीत म्हटले आहे. शिरूर पोलिसांनी अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल केला असून, पोलीस हवालदार शरद वारे याप्रकरणाचा पुढील तपास करत आहेत. गावातील वाढत्या चोरीच्या घटनांच्या पार्श्वभूमीवर पोलिसांनी रात्रीची गस्त वाढवावी, अशी मागणी ग्रामस्थांनी केली आहे.

# शहर ९ तास 'सायकल'स्वारांच्या ताब्यात! प्रमुख रस्ते वाहतुकीस बंद; जाणून घ्या पर्यायी मार्ग

**पुणे । प्रतिनिधी**

पुणे जिल्हा प्रशासनाच्या विद्यमाने व सायकलिंग फेडरेशन ऑफ इंडिया यांच्या सहकार्याने आयोजित पुणे ग्रँड चॅलेंज टूर २०२६ या आंतरराष्ट्रीय सायकलिंग स्पर्धेचे आयोजन १९ ते २४ जानेवारी २०२६ दरम्यान करण्यात आले आहे. या स्पर्धेतील प्रोलॉग रेस मंगळवार, १९ जानेवारी २०२६ रोजी पुणे शहरात होणार असून, त्या पार्श्वभूमीवर वाहतूक विभागाने शहराच्या मध्यवर्ती आणि पश्चिम भागातील रस्ते तब्बल ९ तास बंद राहणार असल्याचे आदेश जारी केले आहेत.



सह पोलीस आयुक्त रंजन कुमार शर्मा, अपर पोलीस आयुक्त (पूर्व प्रादेशिक विभाग) मनोज पाटील आणि पोलीस उपायुक्त (वाहतूक) हिंमत जाधव यांनी दिलेल्या माहितीनुसार, प्रोलॉग स्पर्धेदरम्यान सकाळी ९ ते सायंकाळी ६ वाजेपर्यंत फर्ग्युसन कॉलेज रोड, गणेशखिंड रोड, जंगली महाराज रोड तसेच त्यांना जोडणारे उपरस्ते पूर्णतः वाहतुकीस बंद ठेवण्यात येणार आहेत.या मार्गांवर अत्यावश्यक सेवेतील वाहने (रुग्णवाहिका, अग्निशमन दल, पोलीस वाहने आदी) वगळता सर्व प्रकारच्या वाहनांना बंदी राहणार आहे.

स्पर्धेचा मार्ग –

खंडोजी बाबा चौक – गुडलक चौक – तुकाराम महाराज पादुका चौक – ललित महल चौक – चाफेकर चौक – रेंज हिल्स – सिमला ऑफिस चौक – संचेती चौक – बालगंधर्व चौक – डेक्कन जिमखाना बस स्थानक असा असणार आहे.या संपूर्ण मार्गावर दोन्ही बाजूंनी नो-पार्किंग झोन जाहीर करण्यात आला आहे. वाहतूक सुरळीत राहावी यासाठी वाहनचालकांसाठी विविध पर्यायी मार्ग निश्चित करण्यात आले असून, नागरिकांनी त्याचा वापर करण्याचे आवाहन पोलिसांनी केले आहे.

स्पर्धेमुळे शहराची प्रतिमा जागतिक पातळीवर झळकणार आहे. हा स्वत:चा इव्हेंट समजून सहकार्य करा. सायकल स्पर्धेचा आनंद घेऊन स्पर्धा यशस्वी करा.

– रंजन कुमार शर्मा (सह पोलीस आयुक्त)

या स्पर्धेचा एक टप्पा २३ जानेवारीला पुणे व पिंपरी चिंचवडमध्ये असणार आहे. यामध्ये स्पर्धक ९९ किलोमीटरचा टप्पा गाठतील, त्यातील ५८ किलोमीटरचा भाग पुणे शहरातील असेल. यामुळे २३ तारखेलाही शहरांतर्गत वाहतुकीवर निर्बंध असतील. मात्र, वाहतूक टप्प्याटप्प्याने बंद करण्यात येणार आहे. या दिवशी सुरुवात बालेवाडीतून होऊन समारोप जंगली महाराज रस्त्यावरील झाशी राणी चौकात होणार आहे.

# जिल्हा परिषदेसाठी भाजप-शिवसेना एकत्र, अजित पवारांच्या राष्ट्रवादीला मात्र दे धक्का

**पुणे । प्रतिनिधी**

पुणे जिल्हा परिषद निवडणुकीचे बिगुल वाजण्यापूर्वीच जिल्ह्यातील राजकीय वातावरण चांगलेच तापू लागले आहे. या निवडणुकीत भारतीय जनता पक्ष आणि शिवसेना (एकनाथ शिंदे) एकत्र लढण्याची दाट शक्यता असून, आज दोन्ही पक्षांच्या प्रमुख नेत्यांमध्ये जागा वाटपाच्या निकषांवर महत्त्वाची बैठक पार पडली. मात्र, या सर्व प्रक्रियेत राष्ट्रवादी काँग्रेसला (अजित पवार) सोबत न घेण्याचा सूर उमटला.




पुणे जिल्हा परिषदेतही भाजप-शिवसेना एकत्र निवडणुका लढविणार असल्याचे स्पष्ट संकेत मिळत आहेत.पुण्यातील या महत्त्वाच्या बैठकीला केंद्रीय मंत्री तथा भाजपचे जिल्हा निवडणूक प्रभारी मुरलीधर मोहोळ, राज्याचे उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील, आमदार विजय शिवतारे, भाजपचे नेते राजेश पांडे आणि आमदार राहुल कुल उपस्थित होते.

यावेळी जिल्हा परिषदेच्या एकूण जागांपैकी कोणत्या जागा कोणाकडे राहतील आणि उमेदवारीचे निकष काय असावेत, यावर सविस्तर चर्चा करण्यात आली. दोन्ही पक्षांनी आपापल्या ताकदीचा आढावा घेत प्राथमिक आराखडा तयार केल्याचे दिसून येत आहे.भाजपच्या जिल्हा कोअर कमिटीची बैठक पार पडली. या बैठकीत जिल्ह्यातील भाजप पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी राष्ट्रवादी काँग्रेससोबत (अजित पवार निवडणूक लढवण्यास स्पष्ट विरोध दर्शवल्याची माहिती समोर आली आहे. स्थानिक पातळीवर राष्ट्रवादीसोबत असलेले संघर्ष आणि कार्यकर्त्यांची नाराजी लक्षात घेता केवळ शिवसेनेसोबत युती करून पुढे जावे, असा सूर या बैठकीत उमटला. त्यानंतर दुसऱ्या दिवशी झालेल्या बैठकीतही भाजप व शिवसेना एकत्रपणे जिल्हा परिषद निवडणुका लढविणार असल्याची शक्यता आहे.

पुणे ग्रामीणमधील पक्षाच्या सर्व पदाधिकाऱ्यांची बैठक घेण्यात आली. जिल्हा परिषदेच्या निवडणुकीचा आढावा घेण्यात आला आणि चर्चा झाली. दुसऱ्या दिवशीही प्रमुख पदाधिकाऱ्यांच्या उपस्थितीत बैठक झाली. त्यात महायुती करण्याबाबत प्राथमिक चर्चा झाली. पुणे जिल्हा परिषदेच्या निवडणुकीत पूर्ण ताकदीने उतरणार असून, वर्षानुवर्षे सत्ता असलेल्या लोकांकडून काहीच कामे झाली नाही, ते जनतेपर्यंत पोहाचविण्याचा प्रयत्न केला जाणार असल्याची माहिती भाजपचे प्रदेश सरचिटणीस राजेश पांडे यांनी दिली.

# केंदूरमध्ये कोयत्याचा धुमाकूळ; ७० वर्षीय वृद्धाला मारहाण करून सोन्याचे दागिने केले लंपास

**शिक्रापूर । प्रतिनिधी**

केंदूर (ता. शिरूर) येथे पहाटेच्या सुमारास तीन चोरट्यांनी घरात घुसून कोयत्याचा धाक दाखवत एका कुटुंबाला मारहाण केली आणि सोन्याचे साडेचार तोळे दागिने व रोख रक्कम लुटून नेल्याची घटना घडली आहे. याप्रकरणी शिक्रापूर पोलिसात तीन चोरट्यांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला असून, परिसरातील नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे.

केंदूर येथील बबन सुक्रे हे आपल्या कुटुंबासह घरात झोपलेले असताना रात्री तीनच्या सुमारास चोरट्यांनी दरवाजाच्या सापटीतून हात घालून कडी उघडली आणि घरात प्रवेश केला. बबन सुक्रे जागे झाले असता चोरट्यांनी त्यांना कोयत्याचा धाक दाखवून सर्व दागिने देण्याची मागणी केली आणि त्यांना कोयत्याने मारहाण केली. बबन सुक्रे यांनी आरडाओरडा केल्यावर त्यांची पत्नी लताबाई जाग्या झाल्या.

चोरट्यांनी त्यांनाही धमकावून त्यांच्या अंगावरील दागिने काढून घेतले आणि घराला बाहेरून कडी लावली.त्यानंतर चोरट्यांनी शेजारील खोलीत झोपलेली सून काजल हिच्या खोलीत प्रवेश केला. तिला जीवे मारण्याची धमकी देऊन चोरट्यांनी तिच्या अंगावरील दागिने आणि कपाटातील रोख रक्कम असा एकूण साडेचार तोळे सोन्याचा ऐवज लंपास केला. चोरटे पसार झाल्यानंतर बबन सुक्रे यांनी शेजारील अशोक सुके यांना फोनवरून माहिती दिली. अशोक यांनी येऊन घराच्या कड्या उघडल्या. घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी धाव घेऊन पाहणी केली. बबन दशरथ सुक्रे (वय ७० वर्षे) यांनी दिलेल्या फिर्यादीवरून शिक्रापूर पोलिसांनी गुन्हा दाखल केला असून, पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक महेश डोंगरे व प्रतीक जगताप करत आहेत.

## महापालिका म्हणजे कमिशनचा धंदा नाही!; नवीन नगरसेवकांना मुख्यमंत्र्यांचा पहिलाच कडक डोस

**पुणे । प्रतिनिधी**

महापालिका हे आपले कमिशन नाही आणि महापालिका हा आपला व्यवसायही नाही. पालिका हे आर्थिक, सामाजिक विकासाचं माध्यम आहे. त्यामुळे पारदर्शकपणे, प्रामाणिकपणे काम पार पाडणे आवश्यक आहे. कोणी कितीही मोठा असला, तरी कोणाचाही उन्माद, गैरकारभार खपवून घेतला जाणार नाही असा इशारा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पुण्यातील नवनिर्वाचित उमेदवारांना दिला आहे.



महापालिका निवडणूक निकालानंतर लगेच दुसऱ्याच दिवशी पुण्यात आलेल्या मुख्यमंत्री फडणवीस यांनी या सर्व नगरसेवकांशी संवाद साधला. यावेळी त्यानी स्पष्ट शब्दांत नगरसेवकांनी कसे काम करावे याच्या सूचना दिल्या आहेत.केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ, उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील, नगरविकास राज्यमंत्री माधुरी मिसाळ, खासदार प्रा. डॉ. मेधा कुलकर्णी, शहराध्यक्ष धीरज घाटे, प्रदेश सरचिटणीस राजेश पांडे उपस्थित होते. या निवडणुकीत पराभवाचा सामना करावा लागलेल्या उमेदवारांचाही भावी नगरसेवक असा उल्लेख करीत फडणवीस यांनी त्यांचेही मनोबल वाढवण्याचा प्रयत्न केला. महापालिका हा आपला व्यवसाय, कमिशनचा धंदा नाही. त्यामुळे पक्ष ज्याला जी जबाबदारी देईल, ती त्याने उत्तमरित्या पार पाडावी. आपली प्रतिमा हे राजकारणातील सर्वात मोठे धन आहे. तुमची प्रतिमा ही भाजपची प्रतिमा आहे. या प्रतिमेला तडा जाऊ न देता सर्वांनी पुणे महापालिकेत काम करावे.

# बारामतीत मका हमीभाव खरेदी केंद्र सुरू; शेतकऱ्यांना मोठा दिलासा

**बारामती । प्रतिनिधी**

बारामती कृषी उत्पन्न बाजार समितीच्या जळोची उपबाजार आवारात मका हमीभाव खरेदी केंद्र सुरू झाले आहे. बाजार आवारात लिलावामध्ये मकेचे दर हमीभावापेक्षा कमी निघत असल्याने तसेच शेतकरी संघटनेच्या मागणीवरून समितीने हमीभाव केंद्र सुरू करण्याची मागणी शासनाकडे केली होती. शासनाने मंजुरी दिल्यानंतर हे केंद्र सुरू करण्यात आले आहे.



केंद्र शासनाचे किमान आधारभूत खरेदी योजनेंतर्गत हंगाम २०२५-२६मध्ये मका खरेदीसाठी नाव नोंदणी सुरू आहे. ज्या मका उत्पादक शेतकऱ्यांनी ऑनलाइन नोंदणी केली नाही अशा शेतकऱ्यांनी २८ फेबुवारी पर्यंत नाव नोंदणी करून खरेदी केंद्राचा लाभ घ्यावा असे आवाहन बारामती कृषी उत्पन्न बाजार समितीने केले आहे. ऑनलाइन नोंदणी केलेल्या शेतकऱ्यांना एसमएसद्वारे मका घेऊन येण्याची तारीख कळविली जाणार आहे. दिलेल्या तारखेलाच शेतकऱ्यांना मका आणावी. मकेचा हमीदर २४०० रुपये क्विंटल असून प्रतिएकर ९.५० क्विंटल मका घेण्यात येणार आहे. शासनाने दिलेल्या अटीनुसार आवश्यक कागदपत्रे जमा करून नावनोंदणी करावयाची आहे. सदरचे केंद्र जळोची उपबाजार येथील भाजी मार्केट आवारातील गोदामात सुरू असल्याची माहिती सचिव अरविंद जगताप यांनी दिली

बाबालाल काकडे निरा कॅनॉल संघात ऑनलाइन नोंदणी सुरू आहे. आजवर २२० शेतकऱ्यांची नोंदणी पूर्ण झाली आहे. शेतकऱ्यांनी मका विक्रीसाठी आणताना ती वाळवून, पुरेशी स्वच्छ करूनच आणावी, असे आवाहन संघाचे अध्यक्ष सतीश काकडे यांनी केले आहे. बारामतीच्या पुरवठा अधिकारी तितिक्षा बारापात्रे, निरीक्षक कचरे, मार्केटिंग फेडरेशनचे प्रमोद लोखंडे, बाबालाल काकडे निरा कॅनॉल संघाचे व्यवस्थापक सुरेश काकडे, अमोल कदम, शशांक जगताप, प्रशांत मदने आणि बाजार समितीचे विभाग प्रमुख सूर्यकांत मोरे या वेळी उपस्थित होते.

# पुणे ऐवजी हडपसर स्थानकावर गाड्या टर्मिनेटच्या निर्णयाविरोधात संघटना आक्रमक

## नांदेड, छत्रपती संभाजीनगर, जालना, लातूरमधील प्रवाशांची होणार गैरसोय

**नांदेड । प्रतिनिधी**

येत्या २६ जानेवारीपासून नांदेड-पुणे एक्स्प्रेससह हरंगुळ (लातूर)-पुणे स्पेशल प्रमाणे मराठवाड्यातून येणाऱ्या अनेक गाड्या पुणे जंक्शनऐवजी हडपसर स्थानकावरच टर्मिनेट करण्याचा निर्णय पुणे विभागाच्या मध्य रेल्वे प्रशासनाने घेतला आहे. यामुळे मराठवाड्यातील छत्रपती संभाजीनगर, जालना, लातूर, नांदेड, परभणी, धाराशिवसह सर्वसामान्य प्रवाशांची गैरसोय होणार आहे. त्यामुळे प्रवाशी संघटना आक्रम झाली आहे. हा निर्णय तत्काळ मागे घ्यावा, अन्यथा प्रवासी आंदोलन करतील, असा इशारा दिला आहे.

दरम्यान, अमरावती-पुणे गाडीला वगळता महाराष्ट्रातून खासकरून मराठवाडामार्गे पुण्यात येणाऱ्या बहुतेक सर्वच गाड्या हडपसरपर्यंतच मर्यादित करण्यात आल्या आहेत. माजी केंद्रीय रेल्वे राज्यमंत्री रावसाहेब दानवे यांनी नांदेड-पुणे नियमित एक्स्प्रेस हडपसरहून पुणे जंक्शनपर्यंत वाढवण्याचे निर्देश दिले होते. मात्र, पुणे विभागाच्या नवीन प्रस्तावानुसार रेल्वे बोर्डाने पुन्हा हा निर्णय मागे घेतला असून गाडी हडपसरवरच थांबवण्याचा मार्ग निवडला आहे.

दरम्यान, रेल्वे प्रशासन 'लाइन मिळत नाही, शंटिंगची अडचण' अशी कारणे देत असले तरी राजस्थान-गुजरात-उत्तर भारतातून येणाऱ्या




गाड्या जेजुरीपर्यंत कुठेही स्टॅबल करून ठेवतात. मग, मराठवाड्याच्या गाड्यांसाठीच अडथळे कसे? असा प्रश्न संघटनांनी उपस्थित केला आहे. तळेगाव किंवा खडकी येथे पर्यायी व्यवस्था करू शकतो, असेही प्रवासी संघटनांचे मत आहे.

पहाटे उतरणाऱ्या प्रवाशांना ऑटो मिळणे अवघड

नांदेड-पुणे एक्स्प्रेस हडपसर येथे पहाटे ४.३० वाजता पोहोचते. यावेळी त्या परिसरात कोणतीही पुणे महानगर पालिकेची बस सेवा नाही. त्याच बरोबर खासगी वाहने अव्वाची सव्वा भाडे आकारतात. पिंपरी-चिंचवड, शिवाजीनगर, स्वारगेट, मनपा, खराडी याठिकाणी जाण्यासाठी थेट कनेक्टिव्हिटी नसल्याने सर्वसामान्य प्रवाशांचे हाल होणार आहेत. तसेच वृद्ध, महिला, विद्यार्थी आणि दररोज पुण्यात नोकरीसाठी प्रवास करणाऱ्या शेकडो मराठवाड्यातील प्रवाशांना याचा फटका बसणार आहे.

दोन्ही गाड्या मराठवाडा विभागातील प्रप्रवाशांसाठी उपयुक्त

नांदेड विभागातून पुणे शहरासाठी दररोज फक्त २ गाड्या आहेत. मराठवाडा विभाग हा काहीसा मागासलेला भाग आहे, त्यामुळेच मराठवाड्यातील बहुतेक लोक पुणे आणि आसपासच्या परिसरात नोकरी करतात, तसेच मराठवाडा विभागातील विद्यार्थीही शिक्षणासाठी पुणे आणि उपनगरीय भागात राहतात. त्यामुळे या दोन्ही गाड्या मराठवाडा विभागातील प्रवाशांसाठी खूप उपयुक्त आहेत, असे प्रवाशी संघटनांनी सांगितले.

# एमडी ड्रग्जविरोधात धडक कारवाई ; २ कोटींहून अधिकचा मुद्देमाल जप्त

**शिरूर । प्रतिनिधी**

शिरूर तालुक्यात अमली पदार्थांच्या वाढत्या विळख्याला आळा घालण्यासाठी शिरूर पोलीस ठाणे व स्थानिक गुन्हे शाखा, पुणे ग्रामीण यांच्या संयुक्त पथकाने अत्यंत महत्त्वाची आणि धक्कादायक कारवाई केली आहे. बाबुरावनगर, शिरूर परिसरात एमडी (मेफेड्रॉन) या अमली पदार्थाची विक्री होणार असल्याची खात्रीशीर गुप्त माहिती मिळाल्यानंतर राबविण्यात आलेल्या छाप्यात तब्बल १ किलो ५२ ग्रॅम एमडी जप्त करण्यात आली आहे.



या कारवाईत एकूण २ कोटी १० लाख ७० हजार रुपयांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला असून शादाब रियाज शेख (वय ४१, रा. शिरूर) या आरोपीस अटक करण्यात आली आहे. दि १७ जानेवारी २०२६ रोजी रात्री शिरूर पोलीस ठाण्याच्या हद्दीत अवैध धंद्यांविरोधात पेट्रोलिंग सुरू असताना स्थानिक गुन्हे शाखेला मिळालेल्या गोपनीय बातमीद्वारे ही माहिती समोर आली. सदर माहिती तात्काळ शिरूर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक संदेश केंजळे यांना कळविण्यात आली. त्यांनी ही बाब वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या निदर्शनास आणून दिली.त्यानुसार एनडीपीएस कायद्याच्या कलम ४२ अन्वये आवश्यक ती परवानगी उपविभागीय पोलीस अधिकारी प्रशांत ढोले (शिरूर उपविभाग) यांच्याकडून दूरध्वनीद्वारे घेण्यात आली. यानंतर छाप्यासाठी पंच, छायाचित्रकार, वजनकाटा व पंचनाम्यासाठी लागणारे साहित्य बोलावून घेण्यात आले. पंच म्हणून नितीन बाद्ध गरदाळे (वय २१) व रामदास गेरोबा अरदवाड (वय ३८) यांची उपस्थिती निश्चित करण्यात आली. स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस उपनिरीक्षक पंडित मांजरे, पोलीस हवा.निलेश शिंदे, जनार्दन शेळके, तुषार पंधारे, राजू मोमीन, संजय जाधव तसेच मुख्यालय पुणे येथील पोलीस कॉन्स्टेबल पोपट गायकवाड, शिरूर पोलीस ठाण्याचे पो. उप.नि. दिलीप पवार, अंबादास थोरे, सचिन भोई आदी अधिकारी व कर्मचारी पथकात सहभागी होते.

रात्री सुमारे १२.१० वाजण्याच्या सुमारास बाबुरावनगर येथील मोकळ्या मैदानाजवळ सापळा लावण्यात आला. त्यावेळी काळ्या रंगाच्या हिरो होंडा पॅशन दुचाकीवरून आलेल्या इसमास थांबविण्यात आले. चौकशीदरम्यान त्याने आपले नाव शादाब रियाज शेख असल्याचे सांगितले. त्यास एनडीपीएस कायदा कलम ५० अंतर्गत त्याचे हक्क समजावून सांगून पंचांसमक्ष अंगझडती घेण्यात आली. त्याच्याकडील बॅगमध्ये एमडी (मेफेड्रॉन) हा अमली पदार्थ आढळून आला. वजन केले असता त्याचे वजन १ किलो ५२ ग्रॅम इतके भरले. आंतरराष्ट्रीय बाजारभावानुसार जप्त एमडीची किंमत सुमारे २ कोटी १० लाख ४० हजार रुपये असून आरोपीकडील दुचाकी, मोबाईल फोन व रोख रक्कम असा एकूण २ कोटी १० लाख ७० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. सर्व मुद्देमाल पंचनाम्याने सीलबंद करून ताब्यात घेण्यात आला आहे.

या प्रकरणी शिरूर पोलीस ठाण्यात एनडीपीएस कायदा १९८५ अंतर्गत कलम ८(क), २९ प्रमाणे सरकारतर्फे गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास पोलीस निरीक्षक संदेश केंजळे यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू आहे. या कारवाईमुळे शिरूर तालुक्यातील अमली पदार्थ विक्री साखळीला मोठा धक्का बसल्याचे बोलले जात आहे.